नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

जुन्या सभासदांना नम्र विनंती

स. न. वि. वि.

वि. सा. संघाचे नवीन वर्ष दि. १ एप्रिल पासून सुरू झाले असून चालू वर्षाची साधारण सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ३ आपणांकडून येणे आहे.

वि. सा. संघाचे जे सभासद होतात त्यांना 'युगवाणी' मासिक विनामूल्य पाठविण्यात येते. तरी इ. स. ६६–६७ची वार्षिक वर्गणी रु. ३ पाठवून आपण सभासद व्हावे, अशी नम्र विनंती आहे.

केंद्रीय कार्यालयात आपली वर्गणी जमा होताच 'युगवाणी' चा अंक आपणास पाठविला जाईल.

आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. कळावे ही विनंती.

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस
वि. सा. संघ. नागपूर

दि. १ एप्रिल ६६

अनुक्रमणिका

दर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक

मा. नी. गलगलीकर

२०] एप्रिल १९६६ [अंक ११

स्मृतिसौरभ

वाढवा जो नवीनाचा आणि तो सण पाडवा
शुभे, हो शिव हे तूते नवे वर्ष, ऋतु नवा !
आशा, आशा तशा आजी उष्णशीतल मानवा
शुभे, हो शिव हे तूते नवे वर्ष, ऋतु नवा !
पिक गाती वसंताचा ऐक मंजुल गोडवा
शुभे, हो शिव हे तूते नवे वर्ष ऋतु नवा !
नवी तिथी, नवा मास, नवे वर्ष, ऋतु नवा
आजि का मिरवावी ना रूपश्रीहि नवी तुवा !

'कमला'
—वि. दा. सावरकर

कविता

तुफानाच्याही वाटेत

थोडे भाविक होऊ नये काय कधी कधी ?
थोडे स्वप्न पाहू नये काय कधी कधी ?
सारे खरे हवा जरा वेगळीच आहे
कुणाचा कंवार काय घेऊ नये कधी ?

कहर झाला आता वरी तिथे कुणी नाही
आणि काही येथे होते तेही आहे नाही
आता ओसाडी असार आणि उसासे अनाथ
दोन शब्दांचा जिव्हाळा काय मागू नये कधी ?

कधी जुळघा कळचा होत्या, तुटून-पांगल्या
फुलांच्याही गळाल्यात पाकळचा पाकळचा
आता एकाकी डहाळ खिन्न हालते आभाळी
फळाफुलांची चर्चाच काय करू नये कधी ?

एकेका महिरपीत होती कनकाची वात
घात झाला मालवली एका पाठोपाठ एक
आता भरीव अंधार कोठे महिरपी महाल ?
ऊर फोडूनिया ठिणगीच का पाडू नये कधी ?

उठे आतून तुफान, खाली खचतात झरे
भुईच्या या घडामोडी, वरी दुभंगती घरे
कधी कधीचा हिशेब ? अर्थ कळो वा न कळो कुणा
तुफानाच्याही वाटेत दिवे लावू नये कधी ?

शरच्चंद्र मुक्तिबोध

कर सैल तू गळ्यातील

कर सैल तू गळ्यातिल
करपाश रेशमाचे
सखि रत्नदीप आता
विझलेत वासनेचे.

अनिरुद्ध चांदण्यांचा
पाऊस थांबलेला
पाण्यात क्षीण झाले
प्रतिबिंब अंबराचे

पूर्वेस हासलेला
गालात शुक्रतारा
पाऊल वाजलेले
प्राचीवरी उषेचे.

खर्जात घर्घराया
लागे दूरात जाते...
ओवीतुनी मिसळले
आवाज कंकणांचे.

कर सैल हे गळ्यातिल
करपाश रेशमाचे
ओतून गीत जा तू
ओठात अमृताचे !

उ. रा. गिरी

काही क्षण असे

काही क्षण असे, पाखरांसारखे. उडून जातात.
झाडावर नुसत्या घरट्याच्या खुणा मागे उरतात.
पाण्यावर अशा कितीक शब्दांच्या ओळी पांगतात.
काळोखात रात, बुडे तसे मन अंधार बनात.

ना. धों. महानोर

दोन कविता

देणाऱ्याने किती द्यावे
माझी फाटलेली झोळी
दान मिळाले मातीला
मला आसवांच्या ओळी.

झाले घेतल्याचे ऋण
ज़री ओंजळीला माती
दुःख सोसता शोषता
पाप दुणावले माथी.

आता मातीचा सोयरा
माती मातीला मिळावी
मात्र पुढच्या जन्माला
लाभो दिल्याची पुण्याई.

कृष्णमाधव

निसर्ग चित्र

विचित्र हिरवी झाडे
दूर सभोवार
चांदणे अनिवार.

तडफडत्या गीतांचा
प्रत्यही आभास
घुसमटते श्वास.

मी या अपार शुभ्र
शीत चांदण्यात
रक्तरंग डोळ्यात.

विचित्र हिरवी झाडे
चंद्र माथ्यावर
हात हृदयावर.

वसंत आबाजी डहाके

दिवंगताचे गीत

जिवंत माझ्या कलेवराला अजून आयुष्य हाक मारी !
कशास हाका भिकारड्याला पुकारतो हा दुजा भिकारी ?

भिकेत आणुन आस तेव्हा प्रतारणांचा प्रपंच केला...
अता दुवा देत देत माझी जियेतिथे हिंडते शिसारी !

कशी करू सांत्वने कुणाची ? अजून अश्रू कितीक झेलू ?
...पिढ्यापिढ्यांच्या मनोगतांचा वनू कसा एकटा फुलारी ?

मिळेल त्या तोतया क्षणाशी जमेल तो डाव मांडिला मी
अजूनही स्वप्नद्यूत चाले अजून हा मी असा जुगारी !

बसून खोटारड्यात मीही करू कशी अब्रुवार पापे ?
कळे न माझ्यामधून होऊ कधी कसा अन् कुठे फरारी ?

दुभंगलेल्या उरात माझ्या कितीकिती सूर्य झोप घेती...
चुकून हे रक्त पेटण्याची कधीमधी दाखवी तयारी !

असंख्य माझ्या पराभवांचे चिणून मी टाकिले इरादे,
मघेच ही बंडखोर गीते उफाळुनी फुंकिती तुतारी !

उगीच एका दिवंगताने करू नये एवढी अपेक्षा...
असाकसा हा वसंत येई पुन्हा पुन्हा माझियाच दारी ?

—सुरेश भट

केशवसुत

मध्यरात्रीच्या काळाकुट्ट भीषण काळोखात
जेव्हा अवगुंठित कळयांना नव्हते स्वातंत्र्य
सकाळी उमलण्याचेही.
दिशाहीन ताऱ्यांचे अस्तित्व;
शांततेच्या निर्जन रानात झोपलेले पानन्पान
हृदयालाही घरे पाडणारी उदास निस्तब्धता...
अशा वेळीच तू यायला हवे होतेस—
अलौकिक प्रकाशाचे लेणे लेऊन.
जडालाही पिळवटून टाकणारे तुझे विचित्र दुःख
पण त्यालाही भरजारी किनार होती—
अपार्थिव वेदनांची.
अज्ञाताच्या सीमारेषेवरील तुझी वाटचाल...
जिथे कमळांनाही नव्हता शाप
रात्री पाकळ्या मिटण्याचा.
देवघरातील ज्योतीप्रमाणे बंदिस्त चंद्रसूर्य
पूर्णतेतूनही ओसंडणारी अथांग परिपूर्णता
तिथे निश्चितच मिळाले असेल तुझ्या "कोणीकडून ?—कोणीकडेला ?"
पूर्णाकडून पूर्णाकडेचे शांतिदायक उत्तर.
मुक्त मनाने अनुभवीत असशील तू
चिरंतन सौंदर्याचे दिव्यभास
झपूर्झाच्या विलक्षण तंद्रीत !
भावनांच्याही बेफाम वादळवाऱ्याला
पेलून धरणारे तुझ्या आत्म्याचे शीड
आज निश्चितच स्थिरावले असेल
ऐहिकतेच्या पैलतिरावर
अतीव, अपार्थिव चैतन्याचा.....
दिव्यानंद अनुभवीत !

—कृष्णा चौधरी

भयानक आणि आनंद

रा. अ. काळेले

आपल्या रसव्यवस्थेत भयानक रसाला सुरुवातीपासून स्थान दिलेले आहे. भरतोक्त अष्टरसात भयानकाचा समावेश आहे. भयानकाचे रसत्व कधी कोणी अमान्य केले नाही. भय ही भावना मूलभूत, सार्वत्रिक आहे. मनुष्यासच नव्हे तर प्राणिमात्रांना भय आहे. भयभावना आस्वाद्यतेच्या कसोटीस पूर्णपणे उतरते भयानकाचे आकर्षण लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना सारखेच वाटते. राक्षसादिकांच्या आवडत्या गोष्टींपासूनच छोटचा मुलांच्या वाचनास सुरुवात होते. रसांच्या नामावळीत शृंगाराचे नाव आद्यस्थानी असले, तरी आस्वाद येण्याच्या बाबतीत भयानकाचा क्रम पहिला लागतो.

रसबीजभूत स्थायी भावांपैकी इतिहासादि भावना सुखात्मक तर शोकादि भावना असुखात्मक म्हणता येतील. रसांना सुखदुःखात्मक म्हटलेच आहे. रत्यादि भावनांपैकी आनंदाहून सर्वात दूर अशी जर कोणती भावना असेल तर ती भयाची भावना होय. असे असता भयाचा भयानक रस का होतो ? म्हणजे भयानकापासून आनंद का होतो हा प्रश्न विचारणीय वाटतो.

संस्कृत काव्यमीमांसकांनी रसाला अलौकिक चमत्कार म्हटले. त्यामुळे आनंद का होतो त्याचे उत्तर कठीण नव्हते. रसाबद्दल जे म्हटले तेच आनंदाबद्दल म्हणायचे. म्हणजे भावना कोणतीहि असो, ती रति भावना असो, शोक असो, भय असो की जुगुप्सा असो त्यापासून रसात्मक आनंद का होतो या प्रश्नाला एकच उत्तर, हे—अलौकिक चमत्कार !

परंतु आधुनिक विचक्षणांचे समाधान अशा उत्तराने होऊ शकत नाही. ज्याला पूर्वी आम्ही अलौकिक चमत्कार समजून राहिलो त्याचे कारण आता आम्ही मानसशास्त्राच्या प्रकाशात शोधतो. करुणरसापासून आनंद का मिळतो या प्रश्नाची आता आमचे साहित्यविचारवंत सोपपत्तिक चर्चा करतात, आणि तो प्रश्न निरनिराळचा रीतीने सोडविण्याचा प्रयास करतात. करुणरसापासून आनंद का होतो या प्रश्नाचे उत्तर आम्ही गेली तीस वर्षे शोधत आहोत. अजून पूर्ण समाधानकारक उत्तर सापडले असे म्हणवत नाही. तो प्रश्न अजून विकट वाटतो.

मुद्दा असा, की आनंदाचा कठीण प्रश्न करुणरसापुरताच नाही. भयानक, बीभत्स यांच्या बाबतीत तोच प्रश्न पडतो. बीभत्साचा प्रश्न कोणी निराळचा

प्रकारे सोडवतात. ते बीभत्साचे रसत्वच नाकारतात. म्हणजे पुढे आनंदाचा प्रश्नच उरत नाही. परंतु भयानकाच्या बाबतीत अशी युक्ती चालत नाही. भयानकाचे रसत्व विवादातीत आहे. ते कोणत्याहि स्थितीत नाकारता येत नाही.

आनंदाचा प्रश्न भयानकाच्या बाबतीत जास्त कठीण वाटतो. शोक भावना आनंदाउलट असली तरीसुद्धा आनंदाचा धागा करुणापर्यंत ओढणे अशक्य नाही. उदाहरणार्थः कारुण्य, सहानुभूती, समाधान, आनंद अशी प्रक्रिया सांगण्यात येते. इतकेच काय, पण आनंदाश्रू आणि दुःखाश्रू यात मुळी भेदच नाही असेहि एक मत आहे !

करुणापासून होणाऱ्या आनंदाचा प्रश्न विशेषतः Katharsis च्या उपपत्तीच्या अनुरोधाने सोडविण्यात आलेला दिसतो. ॲरिस्टॉटलच्या सिद्धान्तातील ' purgation ' या शब्दातून ' विरेचन ' या व्यतिरिक्त दुसरे अनेक अर्थ भाष्यकारांनी काढले. उपशम, विशुद्धीकरण, उदात्तीभवन हे त्यातील काही अर्थ होत. अशा रीतीने करुणाची आनंदाशी सांगड पाडण्यात आली. परंतु Katharsis च्या भाष्यांचा करुणजन्य आनंदाचे गूढ उकलण्याच्या कामी काही उपयोग होण्यासारखा असला, तरी भयानकाच्या बाबतीत त्यांचा फारसा उपयोग होईल असे वाटत नाही. उदाहरणार्थ, शोकाचे उदात्तीभवन करू शकते. पण भयाचे उदात्तीभवन म्हणजे कसे ? (मर्ढेकरांच्या ' भव्य भीती ' सारखे की काय ?)

बरे. भयाचे विरेचन किंवा उपशम, किंवा भयावर विजय आणि त्यामुळे आनंद अशी साखळी बसवली तर त्यातही अडचण आहे. भयाचे विरेचन, उपशम झाल्याने, किंवा भयावर विजय मिळाल्याने आनंद होतो असे मानले तरी पण तो आनंद भयानक रसाचा नाही ही गोष्ट ध्यानात आणण्याजोगी आहे. स्थायीभाव जोवर उद्दीपित परिपुष्ट असतो तोवर रस आणि तज्जन्य आनंद राहातो. स्थायीभाव सुप्त झाला की रस गेला, आनंदही गेला हे उघड आहे. भयानक रस कोठवर ? मूळ स्थायी भाव भय उद्दीप्त आहे तोपर्यंतच. जी स्थायी भयभावना तिचे विरेचन, शमन झाल्यावर भयानक रसही लुप्त होईल. तसेच भयावर विजय मिळविला की भयच रहाणार नाही, अर्थात् भयानक रस उरणार नाही. विरेचन, शमन, विजय यांपासून आनंद मिळत असेल. मात्र तो भयानक रसाचा आनंद नव्हे हे लक्षात आणावे लागेल. विरेचनादिकाने होणारा आनंद आणि भयानक रसापासून मिळणारा आनंद हे वेगवेगळे होत. फेरफटका मारण्यातला आनंद वेगळा आणि फेरफटका मारून उत्साहाचे विरेचन, शमन झाल्यानंतर आरामखुर्चीत स्वस्थ पडून राहाण्यातला आनंद वेगळा.

काव्यानंदाची मीमांसा करताना ' काव्यालोचन 'कारांनी स्वायत्त तादात्म्याची उपपत्ती मांडलेली दिसते. त्यांचा थोडक्यात मतलब हा, की कोणत्या पात्राशी

तद्रूप व्हायचे हे वाचकाच्या स्वाधीन असते. नाटक, कादंबरीत पात्रे पुष्कळ असतात. सर्वच पात्रांशी वाचकाचे तादात्म्य कसे होणार ? तर त्याचे उत्तर असे की निरनिराळ्या क्षणी निरनिराळ्या पात्राशी तद्रूप होणे अशक्य नाही. आणि काव्य वाचत असता रसिक सर्वच पात्रांशी तद्रूप होत असतो असे नाही. नीच पात्राशी तद्रूप होण्याची आवश्यकता नसते. तसेच, पात्र हास्यास्पद असेल तेथें वाचक पात्राशी तादात्म्य न पावता कवीशी तादात्म्य पावतो.

अर्थात् निरनिराळ्या क्षणी कोणत्या पात्राशी तद्रूप व्हायचे, कोणत्या पात्राशी तद्रूप व्हायचे नाही, पात्राला सोडून कवीशी केव्हा तद्रूप व्हायचे हे सर्व वाचक ठरविणार. पण इतकी अवधाने सांभाळायची म्हटले तर मग त्याने कोठल्या तादात्म्याची आशा धरावयाची ? खरी गोष्ट तर ही, की मग तादात्म्य जाऊन स्वायतत्ता काय ती शिल्लक राहील ! ज्या पात्राशी वाचक तद्रूप होत नाही किंवा ज्या पात्राशी तद्रूप होण्याची आवश्यकता नाही अशी निरर्थक पात्र कवी घालील तरी कशाला ?

शिवाय, कोणाशी तद्रूप व्हायचे आणि कोणाशी नाही हे सर्वस्वी वाचक-स्वाधीन मानले तर तादात्म्यात अनेक विकल्प संभवतील आणि अराजक माजेल ! ' स्वायत्त तादात्म्य ' हा मुळी वदतोव्याघात वाटतो.

भयानकात तादात्म्य असते काय हाही प्रश्न आहे. भयानकात तादात्म्या-पेक्षा स्वात्म्यच असते असे म्हणावे लागेल. भयामध्ये आभिमुख्य नसून उलट पलायन असते. विवर्जन, पलायन यांच्याशी भयभावनेचे साहचर्य आहे. आत्म-रक्षणाची मूळ सहजप्रवृत्ती भयाच्या बुडाशी आहे. भय म्हणजे जीवनकलहामधील आत्मरक्षणासाठी आपल्याशी पीछेहाट म्हणता येईल. भयात स्वात्म्य म्हणायचे ते या अर्थाने.

मग भयानकापासून आनंद का मिळतो ? भयानकापासून मिळणाऱ्या आनंदाचे कारण कदाचित भयाच्या प्रक्रियेतच सापडू शकेल.

भयाच्या बुडाशी आत्मरक्षणाची सहजप्रवृत्ती आहे हे वर सांगितलेच.— रक्षणाची आवश्यकता केव्हा ? सुरक्षिततेच्या अभावी, म्हणजे अरक्षिततेच्या स्थितीत, हे उघड आहे. भयात काय होते ? गंभीर आणीबाणीला तात्काळ तोंड देण्याचे आवाहन होते. ताबडतोब काही करावे म्हणून क्रियाशक्तीस फार वेगाची चालना मिळते. परंतु त्याबरोबरच क्रियाशक्तीस अवरोधही उत्पन्न होतो. क्रियेचे सर्वच मार्ग अडविले जातात, आणि सारी शक्ती लुळावल्यासारखी होते. क्रिया-शक्तीला जोराचा उठाव तर मिळतो पण तिची उद्दिष्ट दिशा अडविली गेल्याने ती सगळी शक्ती सैरावैरा धावत सुटते ! सर्व क्रियाशक्तीस एकाच वेळी प्रबल प्रेरणा आणि प्रबल अवरोध हा भयभावनेचा सांगण्याजोगा विशेष होय.

अनुक्रमणिका

भयभावनेला जागृती मिळण्याची अनेक कारणे दाखविता येतील. पूर्वानुभव हे एक कारण होय. पूर्वी विस्तवाचा चटका बसलेला असतो म्हणून विस्तवाची भीती वाटते. मात्र पूर्वानुभव नेहमीच आवश्यक नाही. नुसता जोरकसपणा आणि अवचितपणा भयोत्पादनास पुरेसा होऊ शकतो. मेघांच्या प्रचंड गडगडाटाने काही लोक भेदरून जातात. मागून अवचितच येऊन कोणी खांद्यावर हात टाकल्यास धडकी बसते. अवचितात पुन्हा अपरिचितत्व असेल तर जास्तच भय वाटेल. अपूर्वता हे आणखी भयकारण सांगता येईल. माजघरातील अंधेऱ्या भिंतीवर पांढरे दिसले तर अंगावर भीतीने काटा उभा राहील. खुंटीवरील कोटाच्या बाह्या आपोआप उंच झाल्या, किंवा अंथरलेल्या बिछान्याची आपोआप वळकटी बनली तर ते पाहून भीतीने बोबडी वळेल ! अवचितता, अपूर्वता, यांच्या बरोबर विचित्रता हा देखील एक प्रभावी भयोद्दीपक गुण म्हणून सांगावयास हवा. भुतासारखा विचित्र भास झाला तर हृदयाचे ठोकेच बंद पडतील !

परंतु हे सगळे केव्हा ? अरक्षिततेच्या स्थितीत. अरक्षिततेऐवजी जर सुरक्षितता असेल तर परिणाम अगदी निराळा होईल. प्रस्तुत मुद्यासाठी एक मौजेचे उदाहरण घेऊ. अगोदर सात्त्विक भाव आणि नंतर भावना हा प्रो. जेम्स् यांचा वाद प्रसिद्ध आहे. उत्तरादाखल विपक्षाचे म्हणणे असे—" Let Professor James be confronted first by a chained bear and then by a bear at large; to the one he presents a bun and to the other a clean pair of heels. " आपण यात क्रमपरिवर्तन करू या. अगोदर प्रो. जम्स् यांना खुल्या अस्वलापुढे उभे करा, मग त्यांना बंदिस्त अस्वल दाखवा. पहिल्या प्रसंगी भीतीने पाठीस पाय लावून पळणारे जेम्स दुसऱ्या प्रसंगी अस्वलास रोटी दाखवून त्याच्याशी जवळीक करतात. दोन जेम्समध्ये हे केवढे अंतर ! अंतर कशामुळे झाले ? दोन परिस्थितीमधील अंतरामुळे झाले. पहिली स्थिती अरक्षिततेची तर दुसरी स्थिती सुरक्षिततेची. सुरक्षित स्थितीत होते काय की वास्तविक घटना जाणीवेवर जोराचा आघात तर करते, आणि नेहमीप्रमाणे क्रियाशक्तीस जोरदार चालनाही मिळते, परंतु कर्तव्य असे काहीच नसते. कर्तव्यबन्धनातून ही जी सुटका तेच आनंदाचे बीज—उपद्रवी भयातून उपद्रवीपणा जाऊन भय निरुपद्रवी बनते आणि वैचित्र्यादिकाचे आकर्षण तेवढे राहाते. रसस्थितीत भयानक हा पुष्कळसा अद्‌भुताच्या जवळचा वाटतो.

भयानकापासून आनंद मिळण्यासाठी दोन गोष्टी लागतात. पहिली गोष्ट म्हणजे जे खरे नाही ते खरेच वाटले पाहिजे. आणि दुसरी गोष्ट ही, की ते खरेच वाटले तरी ते खरे नाही याचे ज्ञान वाचकास असले पाहिजे. सत्यवत् आभास आणि मिथ्यात्वाचे ज्ञान एकाच वेळी पाहिजे, म्हणजे **सत्याभास–मिथ्याज्ञान–युगपद्भाव** हे भयानकापासून आनंद होण्याचे कारण म्हणून सांगता येईल.

तिरडी

शशिकान्त नारायण केळकर

काळी रात्र कुजबुजत होती. आजूबाजूला पसरलेली भयाण शांतता ते कुजबुजणे लपून भीतियुक्त चेहऱ्याने ऐकत होती. गोखल्यांच्या वाड्यात इतक्या अपरात्रीसुद्धा भरपूर प्रकाश दिसत होता. अंगणात सतरंजीला पाच–सहा माणसं चोरासारखी अवघडून बसली होती. अधून मधून कुजबुजत होती. मधेच पेंगुळत होती. शेजारी तांब्याभांडं ठेवलं होतं. पडवीत एका तरुण बाईचा देह जमिनीवर पडला होता. बाईचा चेहरा गोड, हसरा दिसत होता. अंगानं गोलसर होती. पण शांत निश्चिन्त पहुडली होती. डोक्याजवळ दोन गुडघ्यात डोकं खुपसून एक तरुण उकिडवा बसला होता. एक मध्यम वयाची पोक्त बाई त्याच्याजवळ बसली होती. त्या तरुणाच्या पाठीवरून हात फिरवीत होती. मध्येच स्वतःलाही आवरत होती. हळूहळू दवल्या स्वरात मुसमुसत होती. दोन–तीन वृद्ध बाया तिच्या शेजारीच बसल्या होत्या. आपलाच जणू अपराध आहे, अशासारख्या करपलेल्या चेहऱ्याने खाली पहात होत्या.

ती मध्यम वयाची पोक्त बाई तोंडात लुगड्याचा बोळा घालून दवल्या स्वरात मुसमुसत होती. पण तिला आवरलं नाही. तिचा रडण्याचा स्वर बाहेर आला. बाहेर आल्यावर बाणासारखा ती स्तब्धता, ते गांभीर्य चिरत चिरत दूरवरच्या काळोखात जाऊन लपून बसला.

सतरंजीवरची माणसं ताठ झाली. पुन्हा सैल झाली. गवाळ्या अस्ताव्यस्त शरीराच्या अप्पांनी त्या अंधारात कुठे तरी टक लावून पाह्यले, नि मग गप्कन डोळे मिटून घेतले. काटकोळ्या नानांनी एक आवंढा गिळला. पंतांनी भीतियुक्त नजरेने सगळ्याकडे पाहिले. आपल्यावर कुणाचं लक्ष नाही याची खात्री करून त्यांनी त्या बाईच्या चेहऱ्यावर स्वतःची दृष्टि खिळवली, मग हळूहळू ती खाली उतरवली. बराच वेळ तिथं स्थिर केली. पण तितक्यात त्यांच्या शेजारचे पेंडसे काही तरी हलक्या आवाजात बोलले. पंतांचं शरीर भीतीनं थरारलं त्यांनी घाईघाईनं आपली नजर दुसरीकडं वळवली. पेंडशांकडे न पहाताच त्यांनी हुंकार दिला. पंतांना वाटलं की पेंडशांनी त्यांना त्या बाईकडे पहातांना पाह्यलं. पण पेंडसे दुसऱ्याच कशाबद्दल तरी बोलत होते. पंत स्वस्थ झाले. त्यांनी एक लांब निःश्वास सोडला. शेजारची आणखी एक मानवी आकृति स्वस्थच होती. गुडघ्यात मान घालून बसलेल्या काळ्यांचा डोळा लागला होता.

घंटेचे चार टोले खणाणले. त्याचे प्रतिध्वनी पुन्हा पुन्हा त्या काळोखात उसळत होते. "अरे, चार वाजले की." बोलके पेंडसे उद्गारले. नानांनी निर्विकार चेहऱ्याने दोन शब्द तोंडाबाहेर लोटले. "वाजले ना." अप्पांनी एकदा पेंडशांकडे व एकदा नानांकडे पाह्यले नि पुन्हा आपली दृष्टी काळोखात खुपसून बसले. काळे तसेच गुडघ्यात तोंड लपवून बसले होते. मुळीच हालत नव्हते. पंत आपली चोरटी नजर त्या बाईच्या चेहऱ्यावरून व शरीरावरून हळू मोरपिसासारखी फिरवीत होते. मध्येच स्थिरावत होते, आणि मध्येच घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे लोकांकडे संशयाने पहात होते. स्वस्थ होत होते. कपाळावरचा घाम धोतराच्या सोग्याने पुसत होते.

तो तरुण बाईच्या हसऱ्या चेहऱ्याकडे तारवटलेल्या नजरेने पहात होता. त्याची अनिमिष नजर बाईच्या चेहऱ्यावर खिळली होती. पण तो त्या चेहऱ्यापलीकडे शून्यात पहात होता. त्याचा चेहरा करपलेला होता. जुन्या गोड आठवणी कशा गोठल्या होत्या, कडक झाल्या होत्या. आतल्याआत त्या एकमेकांवर खुळखुळ्यासारख्या आपटत होत्या, खूप मोठ्ठा आवाज होत होता. विचित्र, भेदक, चिरका आवाज.

ती मध्यम वयाची बाई हळू हळू रडत होती. आसवांबरोबर तिच्या चेहऱ्यावरचं तेजही घुतलं जात होतं. ते तिच्या गालांवरून, हनुवटीवरून ओघळत खाली जमिनीवर पडत होतं नि जिरून जात होतं.

त्या दोन वृद्ध बाया पुष्कळ वेळ स्वस्थ बसल्या होत्या. मग दोघी काहीतरी कुजबुजल्या. एक उठून त्या पोक्त बाईजवळ आली. डोळ्यातले अश्रू पुसत खालच्या आवाजात तिनं तिला काहीतरी विचारले. नंतर ती आत चालती झाली. दुसरी वृद्ध बाई तशीच तिथं बसली होती.

सारखे बोलणारे पेंडसे थकले होते. त्यांनी आपले डोळे भिंतीवर उंचावर असलेल्या कॅलेंडरवर खिळवून ठेवले होते. एखाद्या घोरपडीसारखी त्यांची नजर त्या भिंतीवरच्या कॅलेंडरला घट्ट धरून बसली होती. नाना मधूनमधून आवंढा गिळत होते. काळोख अप्पांची दृष्टी सोडीत नव्हता. काळे तसेच गुडघ्यात मान घालून बसले होते. पंतांचा चाळा तसाच अव्याहत चालू होता. ती बाई जिवंत असताना त्यांना इतकं कधीच पहाता आलं नव्हतं. पण आता ते ही संधी सोडीत नव्हते.

नंतर आणखी तीन माणसं आली. जड पावलानं ती त्या बाईजवळ जाऊन उभी राह्यली. बाईकडे एकदा पाहून एकाने आवंढा गिळला. बाकीच्या दोघांनी दीर्घ श्वास घेतला. नंतर ती सतरंजीच्या उरलेल्या भागावर बरीच जागा असूनही

अंग चोरून बसली. त्यानंतर आणखी दोघं तरुण माणसं आली. तीही त्या सतरंजीच्या उरलेल्या दोन कोपऱ्यांवर जाऊन बसली.

एवढ्यात घंटेचे पाच ठोके वाजले. लोकांना आगगाडीचं एंजीन अंगावरून गेल्यासारखे वाटले. ते ठोके वाजत असताना कुठं तरी अधांतरी तरंगतो आहे, लोंबकळतो आहे असं प्रत्येकाला वाटलं. ठोके बंद होताच प्रत्येकाला हायसं वाटलं अगदी अलगदपणे जमिनीवर आल्यासारखं.

मघा आत गेलेल्या वृद्ध बाईने एका लहान मुलीला हात धरून बाहेर आणले. पांच एक वर्षांची ती पोर. त्या मध्यम वयाच्या पोक्त बाईने तिला छातीशी घट्ट धरलं. तिच्या डोक्यावरून आपला चेहरा फिरवला व तिला त्या बाईच्या देहाला नमस्कार करायला सांगितलं.

तो देह बऱ्याच वेळापासून तिथं पडला होता. बाईच्या चेहऱ्यावरचं हास्य क्वचित मालवलं होतं. पोट थोडं वर आलं होतं. सगळ्या देहातून भेसूरता हळूच डोकावून पहात होती. एक माशी निर्लज्जपणे त्या चेहऱ्याभवती घोंघावत होती. पंतांच्या नजरेसारखी.

ती लहान मुलगी डोळे चोळत होती. आजीच्या त्या विचित्र प्रेमाच्या उमाळ्यामुळे भांबावत होती. जागी होत होती. तिनं जवळ पहुडलेल्या आईच्या देहाकडे पाह्यलं. आईच्या डोक्याशी बसलेल्या बाबांच्या दगडी पुतळ्याकडे पाह्यलं. अंगणात चांदण्यात स्वस्थ बसलेल्या माणसांच्या घोळक्याकडे पाह्यलं. त्यांच्या चांदण्यातील सावल्यांकडे पाह्यलं. मग तिच्या चिमण्या मनाभवती खूप मोठं जाळं निर्माण झालं. त्यातून एक विचित्र भेसूर राक्षसी आकृति निर्माण झाली. झट्कन ती त्या देहापासून दूर झाली आणि आजीला कवटाळून त्या देहाकडे पहात किंचाळली, " आईऽऽ. " त्या बाईचाही बांध निखळला व ती जोरात विलाप काढू लागली. तो तरुण जागा झाल्यासारखा हालला. त्याच्या कोरड्या डोळ्यात ओलावा साचला. त्या वृद्ध बाया पुढं सरकल्या.

पंत एकदम दचकले. बाईवरची नजर काढून इकडे तिकडे पहात शांत झाले. आता माणसं बरीच वाढली होती. सतरंजी दिसेनाशी झाली होती. अंगण माणसांनी भरलं होतं. त्यातल्या दोघा-चौघांनी सिगारेटी पेटविल्या होत्या. सिगारेटींची जळकी तोंडं काजव्यासारखी लखलखत होती, हलत होती.

आता चांगलंच उजाडलं होतं. बायाबापड्यांनीही गर्दी केली होती. ती मध्यम वयाची बाई इतर एक-दोघींबरोबर मोठ्यांदा रडत होती. त्या मुलीला तिथून कुणीतरी बाजूला नेलं होतं.

सतरंजीवरची माणसं उठून उभी राह्यली होती. फाटलेल्या चेहे-यानं कामाला लागली. तो तरुण डोक्याला टॉवेल बांधून अंगणात येऊन बसला होता. उकिडवा नी गुढघ्यांवर टेकवलेले हात लांब करून आक्रसल्यासारखा. बायकांनी बाईचा देह आत नेला होता.

सगळाच कल्लोळ सुरू होता. कुजबूज, रडारड, आश्चर्य, दुःख वेगवेगळ्या तोंडातून बाहेर पडत होतं. एवढ्या सगळ्या गलक्यात सुद्धा प्रत्येकाला वाटत होतं की तो अगदी एकटा आहे. अगदी वेगळा आणि अधांतरी लटकतो आहे. या विचाराबरोबर त्याच्या अंगावर शहारे येतात. मग वळेच तो दुस-यांशी काहीतरी बोलणं काढतो नि रवंथ केल्यासारखं तेच तेच पुन्हा पुन्हा बोलत रहातो. मनाची मधे चाहूल घ्यायलासुद्धा त्याला धीर होत नाही.

आता चांगलंच ऊन आलेलं असतं. काटकोळे नाना फार चपळ असतात. ते तट्टचा जमिनीवर आंथरतात. त्याला काठ्या बांधतात. भराभर दो-या वळतात. गाठी मारतात नि काही मिनिटात तिरडी तयार करतात. अप्पांना नानांचा मत्सर वाटतो. त्यांच्या चपळाईचा विशेषतः, कोरडं हसत ते शेरा मारतात— "नाना, तुम्ही एक्स्पर्ट दिसता यात." नाना उत्तरादाखल नुसतं हसतात. पेंडशांना काहीतरी बोलावसं वाटतं पण बरं दिसणार नाही म्हणून ते चूप बसतात. पंत वेड्यासारखे त्या तिरडीकडे आधाशीपणाने पण मत्सराने टक लावून पहात असतात.

त्या बाईचा देह दोघीतिघी बाया आतून, जवळजवळ फरफटतच बाहेर आणतात. तिला नवं रेशमी पातळ नेसवलेलं असतं. नवं पोलकं घातलेलं असतं. आंघोळ घातलेली असते. तो देह तिरडीवर हळूऽऽ ठेवला जातो.

बाया रडत असतात. भीषणता डोळे वटारून त्यांना चूप रहाण्यासाठी खुणावीत असते. बाया जास्तच रडत असतात. पुरुषमाणसं घोळक्याघोळक्यानी ते पहात उभी असतात.

पंतांना त्या बाईच्या देहाकडे पाह्यचं असतं. आपली दृष्टी तिच्या देहाजवळ ते हळूहळू आणतात. पण घाबरून पुन्हा ते दुसरीकडे लांब दृष्टी वळवतात. कुणाकडं तरी पहात उगाच भुवया उंचावतात. त्यांना भयंकर भीती वाटते की आपला कुणीतरी संशय घेत आहे. आपल्याला जोड्यांनी मारून हाकलून द्यायचा कुणीतरी विचार करतंय. ते आपल्या कपाळावरचा घाम पुसतात. त्यांना त्या नानांचा व काळ्यांचा फार राग येतो. दोघांच्याहि पोटात दोन लांब सु-या खुपसाव्या असंच त्यांना वाटतं.

काळे नानांना मदत करीत होते. नानांनी डोकं उचलून त्याखाली एक उशी घातली. डोकं उचलताना त्यांना फार प्रयास पडताहेतसं दिसलं. डोकं फार

जड झालेलं असावं. वर सरकलेलं नुकतंच घातलेलं रेशमी पोलकं नाना ताणू ताणून फुगलेल्या पोटावर सरकवत होते. नंतर त्यांनी त्या देहावरचा छातीवरच पदर सारखा केला आणि वरून दोरी घट्ट आवळून बांधली. पंतांना त्या दोरीचा भयानक मत्सर वाटला. शक्य असतं तर नानांना त्यांनी कच्चं दातांनी ओरबाडून चावून चावून खाल्लं असतं.

भेसूरतेने त्या देहाचा आता पूर्ण कब्जा घेतला होता. चेहऱ्यावरचं हास्य नि गोडवा त्या चेहऱ्याच्या त्वचेत जिरून गेला होता. भीषण कोरडेपणा फक्त तिथं उरला होता.

तिरडीवर देह पूर्णत: बांधला गेला होता. उन्हं तळपू लागली होती. माणसं घामेजत होती. सुकत होती. कुणीतरी त्या मुलीला बाहेर आणलं. मुलगी रडत रडत वाकून त्या तिरडीला नमस्कार करते. तिची पोक्त आजी त्या मुलीला कवटाळते. तो तरुण भावनावेगात त्या स्त्रीच्या भालप्रदेशाचं चुंबन घेतो. इतराबरोबर पंतही तेव्हा आवंढा गिळतात. त्या पोक्त बाईला व मुलीला बळेच कुणी तरी बाजूला नेतं. तो तरुण हळू उठतो. तिच्याकडे, तिरडीवरच्या स्त्रीकडे, पुन्हा एकदा स्थिर दृष्टीने बघतो. मग झट्कन वाकून तिरडीची एक बाजू धरतो. बाकी तिघंजण धावतात. तिरडी चार पायांनी चालत चालत घराबाहेर पडते. बाया आवेगानं मोठचांदा रडू लागतात. एखाद्या पुरुषाला वाटतं त्या उगाचच निष्कारण रडत असतात. उगाच विधि म्हणून. पण खरं कुणालाच ठाऊक नसतं.

तिरडीवरचा मृत देह झपाझप चार पायांनी पुढे सरकत असतो, आपल्याबरोबर पुष्कळसे जिवंत देह घेऊन ! रस्त्यावरची, आजूबाजची माणसं टवकारून पहातात, दचकतात व पुन्हा आपले व्यवहार सुरू करतात.

ती तिरडी तशीच झपाझप, गंभीरपणे पुढं सरकत असते.

नाना, अप्पा, काळे, पेंडसे, पंत आलटून पालटून खांदे देत असतात. पंतही लगबगीनं पुढं होतात. खांदा दिला असतांना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसतं. एक विचित्र, विजेत्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर येरझारा घालत असतो.

तिरडीवरचा मृत देह लांब लांब टांगा टाकीत, धूळ उडवीत, धूळ झटकीत, लांब सावली सोडत, तिच्यापासून भरभर दूर होत पुढं सरकत असतो.

तिरडी स्मशानात येते. तिथं ती खांद्यावरून खाली उतरते. लोक आसपास बसतात. नाना व काळे लाकडाची चौकशी करतात. लाकडं घेऊन येतात. चिताही रचायला सुरवात करतात. पंत कुणाचं लक्ष नाही असं पाहून आपली दृष्टी पुन्हा पुन्हा त्या देहाजवळ आणतात पण भीती वाटून पुन्हा ते ती दूर वळवतात

कपाळावरचा घाम धोतराच्या सोग्याने पुसून उगाच कुणाकडे तरी पाहून भुवया उंचावतात.

तो तरुण अनिमिष नजरेने त्या देहाकडे पहात असतो.

चिता तयार होते. नाना व काळे देह चितेवर ठेवतात. याही वेळी पंतांना त्यांचा राग येतो. तरीपण त्यांना अजून त्या देहाकडे नजर वळवण्याचे धैर्य झालेले नसते. तो तरुण उठतो. चिता पेटवितो. पुन्हा मटकन खाली बसतो. उकिडवा, गुडघ्यांवर हात लांब सोडून, मान खाली घालून. लोक आजूबाजूला पांगतात. चितेकडे बघत बसतात. कवटी फुटण्याची वाट पहात.

चिता वेगाने पेट घेते. लालभडक ज्वाळा सळसळत आकाशाकडे जातात. त्या तरुणाला वाटतं आपणही त्या ज्वाळांत विलीन व्हावं. आपल्या प्रियेबरोबर आपलंही अनंतासाठी मीलन करून घ्यावं, त्या पेटल्या चितेत उडी घ्यावी.

पंतांनाही असंच वाटतं. त्या देहाकडे शेवटी आपण एकदाही पाह्यलं नाही, याची त्यांना खंत वाटते, रुखरुख लागते. आपल्या भित्रेपणाची लाज वाटते. त्यांना आता वाटतं—त्या पेटत्या चितेत उडी घ्यावी. अजूनही पूर्ण न जळलेल्या त्या देहाकडे, चेहेऱ्याकडे डोळे भरून पहावं, नाना नि काळ्यांसारखं त्याला आपणही हाताळावं, स्पर्शावं......

पण ते दोघंही स्वस्थ बसले होते. त्या चितेत एकानंही उडी घेतली नाही. दोघांनी आपली नजर त्या सळसळत्या लालपिवळ्या ज्वालांपार लावून ठेवली होती. शुद्ध हारपली होती आणि कवटी फुटल्याचा मोठा आवाज त्या दोघांनाही मुळीच ऐकू आला नाही !

———

अनुक्रमणिका

महीपतीचे काव्यविषयक विचार

सौ. उषा मा. देशमुख, एम्. ए.

मराठी काव्यवाङ्मयाला प्रारंभ सामान्यतः यादवकाळात झाला. यादवकाळापासून पेशवेकाळापर्यंत जी मराठी कविता निर्माण झाली ती संस्कृत काव्यापेक्षा बहुतांशाने वेगळ्या प्रकारची होती. तिची अंतःप्रवृत्ती, ध्येयदृष्टी आणि वेषभूषा ही अभिजात संस्कृत काव्याला जुळण्यासारखी नव्हती.

संस्कृतात जे काव्य निर्माण झाले त्या काव्याचा साहित्यशास्त्राच्या दृष्टिकोणातून विचार करणारे अनेक संस्कृत ग्रंथ आज उपलब्ध आहेत व त्या ग्रंथांनी घालून दिलेले नियम तत्कालीन संस्कृत काव्यामध्ये पाळलेले दिसून येतात. परंतु त्याच काळात देशीभाषांमध्ये जी नवीन प्रवृत्तीची किंबहुना संस्कृतपेक्षा भिन्न-प्रकृतीची काव्यरचना झाली त्याची दखल अर्थातच या शास्त्रकारांनी ज्या प्रमाणात घ्यावयास हवी त्या प्रमाणात घेतलेली दिसत नाही. त्यामुळे जगन्नाथ पंडितानंतर संस्कृत साहित्यशास्त्राची परंपरा खंडित झालेली आपल्याला दिसून येते.

तेराव्या शतकापासून मराठी कविता अवतीर्ण होऊन आपले रूप ती समर्थपणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करू लागली. या तिच्या पृथगात्म स्वरूपाची दखल संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी घेतली नाही; पण म्हणून ती तिची तिलाच घ्यावी लागली.

यादवकाळापासून पेशवेकाळापर्यंतचा विचार केल्यास हा काळ म्हणजे महाराष्ट्राच्या दृष्टीने राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन बाबतीत मोठ्या चळवळीचा आणि समृद्धतेचा होता. लोकभाषेत लिहिले गेलेले संतवाङ्मय आणि भक्तिवाङ्मय हे या काळातील महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग होत.

रामदासपूर्वकालीन मराठी कवितेचा साहित्यशास्त्रीय अभ्यास डॉ. केतकर, डॉ. देशमुख इत्यादी विचारवंतांनी केला. पैकी डॉ. केतकरांचा बहुतेक सारा भर प्रत्यक्ष संतकवींच्या कृतींवर नव्हता. शिवाय रामदास खेरीजकरून या नव्या-दृष्टिकोणातून त्यांनी इतर संतकवितेचे सखोल अवलोकन केलेले दिसून येत नाही. साहित्यशास्त्रातील काही मूलभूत तत्त्वांबद्दलची त्यांची माहितीहि अपुरी दिसते. या बाबतीतला दृष्टिकोण सर्वप्रथम पुढे मांडण्याचे श्रेय त्यांच्या श्रेष्ठ प्रज्ञेला दिले पाहिजे, यात मात्र शंका नाही.

डॉ. देशमुखांनी स्वीकृत काव्यखंडातील साहित्यविषयक विचारांचा संतकवींच्या उद्‌गारांच्या आधारे यथाशास्त्र परामर्श घेतला. परंतु त्यांच्या ग्रंथातून संतकवींना अभिप्रेत असलेले काव्याचे प्रकार आणि त्यांची शब्द आणि अर्थ यांच्या परस्पर संबंधाविषयीची दृष्टी, यासंबंधीचा विचार केलेला दिसत नाही.

ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंतच्या मराठी कवितेचा साहित्यशास्त्रीय दृष्टि-कोणातून जसा अभ्यास झाला, तसा रामदास ते रामजोशी अर्थात् शिवकाळ ते पेशवेकाळ या खंडाचा झाला नाही. हा तितकाच महत्त्वाचा कालखंड अस्पृष्ट राहिला आहे. या काळातील पंडित कवि, श्रीधर, महीपति, मोरोपंत आणि शाहीर या महत्त्वाच्या कवींच्या वाङ्‌मयाचा साहित्यशास्त्र–दृष्टचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या कवींच्या लेखनामागची भूमिका कोणती होती ? त्यांचे काव्य-विषयक विचार कोणते होते ? या विचारांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते ? या प्रश्नांचा विचार पद्धतशीर रीतीने झालेला नाही. श्रीधर, मोरोपंत यांच्यावर निदान काही काव्यविवेचनाचे ग्रंथ तरी निर्माण झाले आहेत. पण महीपतीकडे मराठी अभ्यासकांचे लक्ष जावे तितके गेलेले नाही. म्हणून प्रस्तुत निबंधात महीपतीचे काव्यविषयक विचार त्याच्या कृतीतून कितपत सापडतात, त्याची स्वकाव्यविषयक भूमिका कोणती होती, त्यावरून एकंदर काव्यासंबंधी त्याचा दृष्टिकोण काय आहे, याचा विचार करण्याचे योजले आहे.

महीपतीपूर्वी उद्धवचिद्‌घन, दासोदिगंबर, भीमस्वामी, राजाराम प्रसादी, नरहरिमालु इत्यादी चरित्रकार होऊन गेले आहेत, नाही असे नाही. पण महीपतीच्या चरित्रांचे वैशिष्टय या सर्वांहून अगदी वेगळे आहे. वास्तविक सुप्रसिद्ध संतांची चरित्रे लिहिण्याचा प्रघात महाराष्ट्रात जरी फार पूर्वीपासून असला तरी त्यात महीपती आपल्या वेगळेपणाने शोभून दिसतो. संतांची नुसती यादीवजा नावे व क्वचित चारदोन शब्दात काही माहिती सांगणाऱ्या ‘संतमालिका’ अनेक निर्माण झाल्या. या उलट नामदेवाच्या तीर्थावळीचा आधार घेऊन महीपतीने ज्ञानेश्वरांचे चरित्र समर्थपणे उभे केले आहे. दामाजी, भानुदास, एकनाथ यांच्या वंशजांकडे प्रत्यक्ष माहिती मिळवून महीपतीने आपली चरित्रे लिहिली. सारस्वत-कारांनी महीपतीविषयी असे गौरवोद्‌गार काढले आहेत—“तुकारामाच्या चरित्राची माहिती कोणाच्याही ग्रंथावारे न लिहिता महीपतीने प्रत्यक्ष त्याच्या वंशजांकडून मिळवून लिहिली. हे तुकाराम चरित्राचे अध्याय सर्व भक्तविजयात, किंबहुना महीपतीच्या सर्व ग्रंथात फार सरस उतरले आहेत.”

मी विद्वान नाही, मला संस्कृतहि येत नाही. फार काय—

म्यां नाहीं पाहिला अमरकोश । गीर्वाण भाषा तोही निःशेष
नाना पुराणें विशेष । श्रवण सायासें न केलीं कीं ॥

अशासारखे उद्गार महीपती काढतो. पण त्याचे भक्तिविजय, संतविजय, भक्तलीलामृत, संतलीलामृत हे प्रचंड ग्रंथ वाचल्यावर त्याने हे उद्गार विनयाने काढले असावे असे दिसून येते. कारण त्याच्या नावावर या प्रसिद्ध ग्रंथांखेरीज कथासारामृत, गणेशपुराण, `तुळशीमाहात्म्य, दत्तात्रेयचरित्र यासारखी लहान लहान प्रकरणे व अनेक बारीक सारीक कथा आहेत. यांतून त्याची चौकसबुद्धि व पढीक विद्वत्ता दिसून येते.

संतांची चरित्रे वर्णन करीत असताना त्यातून महीपतीचा काव्यविषयक दृष्टिकोण दिसतो काय ? काव्याला आवश्यक गोष्टी कोणत्या आहेत ? काव्य कशाला म्हणावे ?—या प्रश्नांची उत्तरे महीपतीची संतचरित्रे वाचून मिळतात काय ते आता पाहू.

कविकर्तृत्व

'भक्तविजया'त सुरदासाचे चरित्र वर्णन करीत असता सुरदासावर त्याच्या टीकाकारांनी, तो असत्यवाणी बोलत आहे असा आरोप केला, तेव्हा महीपती म्हणतो,

सुवास नसतां कस्तूरी । विकावया मांडिली बाजारीं
तेवीं अंगीं करणी नसतां बरी । कवित्व कुसरी कासया ।।

भक्त. वि. ३६-१२८

कस्तुरीला सुवास नसताना जर ती बाजारात विकावयास मांडली तर ते योग्य होईल का ? त्याप्रमाणे अंगी कर्तृत्व नसेल तर कवित्वामध्ये कौशल्य कसे बरे निर्माण होईल ? येथे महीपतीच्या मते कवीच्या अंगी कर्तृत्व नसल्यास काव्याची कुसर व्यर्थ होय असे दिसून येते. कस्तुरी ही सुवासासाठी प्रसिद्ध आहे, ते सिद्ध करावे लागत नाही. तद्वत् काव्याचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे कवीच्या अंगी असलेली करणी हे होय, ही गोष्ट वादातीत आहे.

कवीचे वक्तृत्व

'भक्तलीलामृता'च्या पहिल्या अध्यायात श्रेष्ठ संतांना नमन केल्यावर महीपती म्हणतो, 'गरीबाघरी काही कार्य निघाल्यास त्याला श्रीमंत साह्य करून ते कार्य पुरे करतात. मीहि तसाच आहे. मी संतांचा भरवसा धरून ग्रंथारंभ केला आहे.'

पाकसिद्धीची खटपटी । अज्ञानबाळक न पाहे दृष्टीं
परी माता लोभ धरोनि पोटीं । कवळहोंटीं लावितसे ।।

भ० ली० १-४८

तैशाचि परी केलें संतीं । आयतीच ओवी आठवून देती
मज मूढाहातीं लिहविती । मग ती मी जाणे ॥

म० ली० १-४९

जैसी भवति भिक्षा करोनी नगरीं । विद्यार्थी मागत माधूकरी
त्याची क्षुधा हरण होय परी । चूल घरीं न पेटे

भ० ली० १-५७

तैसे माझें वक्तृत्व बरें । पदरींचें नाहीं एक अक्षर
हिंडूनि संतांच्या दारोदार । पोटभर जेवीतसें ॥

भ० ली० १-५८

परी भिक्षेचें अन्न परम पवित्र । शास्त्रीं निर्णय केला थोर
साधक जनीं सेविलें जर । तरी बुद्धि विस्तारे त्याची ॥

म० ली० १-५०

माधुकरी मागून ज्याप्रमाणे विद्यार्थी आपली भूक भागवितो, त्याला घरी स्वैंपाक करावा लागत नाही, तसा मी संतांच्या दारोदार हिंडून पोटभर जेवतो. हे भिक्षेचे अन्न अत्यंत पवित्र असते, असा शास्त्राने निर्णय दिला आहे. जर साधकाने त्याचे सेवन केले तर त्याची बुद्धी प्रगल्भ होते. मी संतांच्या दारोदार हिंडून पोटभर जेवतो यात मला माझ्या जवळचे काही घालावे लागत नाही असे माझे वक्तृत्व आहे. म्हणजे मला जी संतचरित्रे वर्णन करावयाची ती मी जशीच्या तशी वर्णन करतो. त्यात माझ्या पदरचे वेगळे काही घालावे लागत नाही. ते माधुकऱ्याच्या भिक्षेप्रमाणे पवित्र आहे. यावरून महीपतीच्या दृष्टीने कवीचे वक्तृत्व म्हणजेच काव्य हे कवीने निरनिराळ्या ठिकाणांहून जमविलेल्या अनुभवांचा संचय होय. त्यामुळे काव्यसाधकाच्या बुद्धीचा विस्तार होतो.

अनुभव

'भक्तलीलामृता 'त भगवानदासाचे चरित्र वर्णन करताना महीपतीने भगवानदासाच्या निःस्पृहपणाचे वर्णन विस्ताराने केले आहे. संपूर्ण राज्याचा अधिकार गुरुचे चरणी ठेवून संतसमागमी कीर्तनात तो दंग झाला. त्याचा पिता माधवदास तोहि असाच संसारी उदास होता. याविषयी महीपती म्हणतो—

कुळा ऐसें होय संतान । धातु ऐसे अलंकार जाण
संचिता ऐसें मनुष्या कारण । फळ प्राक्तन देतसे ॥
ऋतु ऐसेचि होती दिवस । आचरणा ऐसी दीक्षा दिसे
नातरी कवीचे अनुभव जैसे । उद्गार तैसे वदे वाचे ॥ सं. ली. २५-१६५

जसे कुळ तशी त्याची संतती, जसा धातु तसा त्याचा दागिना, मनुष्याचा जसा पापपुण्याचा साठा तसे त्याचे फळ मिळेल. ऋतुमानाप्रमाणे दिवस बदलतो.

जशी वागणूक असेल तसाच आदर्श किंवा उदाहरण निर्माण होते. त्याचप्रमाणे कवीचे अनुभव जसे असतील तसे उद्गार त्याच्या वाणीतून बाहेर पडतील. म्हणजे संतान, अलंकार, फल, दिवस, दीक्षा हे जसे अनुक्रमे कुल, धातू, संचित, ऋतू आणि आचरण यांवर अवलंबून आहे, तसेच कवीचे काव्य हे त्याच्या अनुभवांवर अधिष्ठित असते. कवीचे कर्तृत्व आणि वक्तृत्व तद्वत् त्याचा अनुभव हाहि काव्यनिर्मितीसाठी आवश्यक आहे, असा भाव या उद्गारातून दिसून येतो. म्हणजे अनुभवाच्या खोलीला, लांबीला, रुंदीला पाश्चात्त्यांच्या टीकेनुसार जे महत्त्व दिले गेले त्याची महीपतीच्या या उद्गारांवरून आठवण होते. अनुभवाची महती सांगणारे उद्गार भक्तविजय व भक्तलीलामृत यांतून पुष्कळ सापडतात. उदा०—

अनुभवाविण ब्रह्मज्ञान । शरीर जैसें प्राणाविण
बोलणें ईश्वरकृपेविण । वृथा तैसें दिसतसे ।। भ. वि. २–२१६

अनुभव नसतांचि जाण । व्यर्थचि पुस्तकींचे ज्ञान
तैसेंचि परहस्तीचे धन । दुश्चित्त मन सर्वदा ।। भ. ली. २९–२३

या उद्गारात ज्ञानाच्या संदर्भात जसे अनुभवाचे महत्त्व वर्णिले आहे तद्वत् महीपती हा काव्याच्या संदर्भातहि अनुभवाला विशेष महत्त्व देतो असे दिसून येईल.

ईश्वरगुणवर्णन

भक्तविजयाच्या सदतीसाव्या अध्यायाच्या सुरवातीला महीपती म्हणतो, "मूळ हे जसे झाडाचे कारण आहे, पाण्यामुळे धान्य पिकते त्याप्रमाणे तू, घननीळा, ह्या भक्तकथा वदवितोस आणि—

तुझे न वर्णितां गुण । उदंड कवित्व केलें लेखन
तरी व्यर्थ वाचेसी आणिला शीण । ऐसें दिसोन येतसे ।।
भ० वि० ३७–५

करुणारसें करोनि घननीळा । न आळविलें वेळोवेळां
तरी व्यर्थचि त्याची कवित्वकळा । शीणच उरला वैखरी ।।
भ० ली० ४२–४

ईश्वरवर्णनाशिवाय कवित्व म्हणजे वाणीला व्यर्थ शिणवणेच होय. करुणरसाने जर वारंवार घननीळाचे गुणवर्णन केले नाही तर कवीची कवित्वकळा ही व्यर्थ होय. इतकेच नव्हे तर त्याच्या वाणीला तो शीणच होईल. म्हणजे ईश्वरगुणवर्णन आणि करुणा भाकण्याची अर्थात भक्तीची गोडी ही काव्याला आवश्यक आहे.

कीं आयुष्य सरल्यावांचोनि । काळ न दंडी जीवकोणी
तेवीं कविश्वराची निजवाणी । झाल्यावांचोनि वदेना ॥
कीं दिनमान घटिका न होता पूर्ण । न मावळे सूर्यनारायण
तेवीं चरित्र वर्तल्यावांचोन । कवितें लेखन न करिती ॥
न मिळतां पतिचिया मना । न वर्ते जेवीं पतिव्रता
तेवीं कविश्वरांची वाणी वृथा । असत्यकथा न वदे कीं ॥
कीं स्वयंपाक करावया लागून । प्रार्थूनि आणिली शेजारीण
ते आपुले पदरची सामग्री घेऊन । नयेचि जाण सर्वथा ॥
पाककर्त्री असली चतुर । तरी अन्न करील रुचिकर
तेवीं महाकवि दृष्टांत चार । देईल साचार निरुपणीं ॥
परी मुळींचे पद सांडोनि सर्वथा । असत्य ग्रंथ न वदे कवचिता
म्हणोनि प्रार्थना करितो पंडितां । विकल्प चित्ता न धरावा ॥

भ० वि० २७–७१ ते ७६

आयुष्य सरल्यावाचून यम हा जीवाला दंड म्हणजे मृत्यू देऊ शकत नाही. दिवसाच्या घटिका पूर्ण झाल्यावाचून सूर्य मावळू शकत नाही. किंवा आपल्या पतीच्या मनाला अनुसरल्यावाचून पतिव्रता स्त्री वागत नाही त्याप्रमाणे कवीश्वरांची वाणी असत्य गोष्ट सांगत नाही. शेजारणीला स्वयंपाक करण्याकरिता बोलावल्यास ती आपल्याबरोबर शिधासामग्री आणत नाही. या उलट ती जर चतुर असली तर (घरातील) वस्तूंपासून रुचिपूर्ण स्वयंपाक करील. त्याप्रमाणे कवि चार दृष्टांत देऊन काव्यसौंदर्य निर्माण करील. पण मूळ जी संतचरित्रे आहेत त्याला उणेपणा आणणार नाही. असे महीपतीने पंडितांना उद्देशून, त्यांनी मनात विकल्प येऊ देऊ नये असे विनविले आहे. म्हणजे कवीचे काव्य हे पूर्वकवींच्या कृपाप्रसादावर, स्वतःच्या अनुभूतीवर व साक्षात् घडलेल्या घटनांवर अवलंबून असते.

उत्स्फूर्तता

एकदा नामदेवाने पांडुरंगाची कीर्ती वर्णन करण्यासाठी शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली. त्यावेळी परमेश्वर प्रसन्न होऊन त्यांनी सरस्वतीला आज्ञा केली की, ' तुवां बैसोनि जिह्वाग्रीं । कवित्व वदवावें अति कुसरीं ॥ ' या प्रसंगाचे वर्णन महीपती करतो—

मुखांतूनि निघतांचि अक्षरें । तत्काळ लिहावीं निजकरें
परतोनि पुसिल्या उत्तरें । तरी नयेचि सर्वथा ॥ म० वि० ४८–६३

तोंडातून शब्द निघताच ते ताबडतोब लिहून ठेवले पाहिजेत. कारण ते पुन: पुन: विचारल्यास (आठवण केल्यास) तेच शब्द पुन: आठवत नाहीत. मुखातून स्वाभाविकपणे निघालेले उद्गार म्हणजेच कवित्व असे महीपतीला म्हणावयाचे आहे. काव्याच्या संदर्भात अनुभवांच्या बोलांना जितके महत्त्व आहे तेवढेच महत्त्व उत्स्फूर्ततेला आहे.

दृष्टांत रीती

'संतलीलामृता'च्या चौदाव्या अध्यायाच्या समारोपात महीपती म्हणतो—

तेंवी प्रासादिक संतांचे बोलणें । त्यासी अल्पमतीचीं कोंदणे
नाना दृष्टांत जोडोनि रत्नें । कर्णभूषणें निर्मिली ॥ सं. ली. १४–१०२

दृष्टांत मात्र विघले चार । तेणेंचि ग्रंथ वाढला थोर
जे बहुश्रुत सभाग्य नर । अनुभवी चतुर जाण ॥ सं. ली. १०–४४

तैसी संतांची अनुपम वचनें ।.त्यावरी माझें आर्ष बोलणें
दोन्ही एकचि अनुसंधानें । परी दृष्टांतीं गुण येतसे ॥ सं. ली. १०–५२

आतापर्यंत काव्याला आवश्यक म्हणून ज्या गोष्टी महीपतीच्या दृष्टिकोणातून बघितल्या त्यात दृष्टांतालाही तो महत्त्व देतो हे वरील श्लोकांवरून दिसून येते. संतांची अनुपमवचने व महीपतीचे आर्ष बोल हे दोन्ही एकाच अनुसंधानाने आले असले तरी माझ्या दृष्टांतामुळे त्या अनुपम बोलांना वेगळे महत्त्व येते, असे तो म्हणतो. म्हणजे दृष्टांत हेही एक काव्याचे अंग ठरते.

अनुसंधान आणि लाघव

'संतलीलामृता'च्या तिसाव्या अध्यायात साळचाचे चरित्र वर्णन करताना महीपती म्हणतो—

अनुसंधानाहूनि साचार । कवीचें लाघव पाहिजे फार
तयासि दृष्टांत देऊनिया चार । कथेसि उद्गार आणावा ॥

काव्यामध्ये अनुसंधानाला जितके महत्त्व आहे त्याहून अधिक कवीच्या लाघवाला आहे. उत्तम कथेचे अनुसंधान, कवीचें चातुर्य व दृष्टांतांची जोड यांच्या साहाय्याने कथेला म्हणजेच काव्याला उद्गार आणावा.

रसोत्पत्ति

भक्तविजयाच्या सातव्या अध्यायाच्या उपसंहारात, मी आता ज्ञानेश्वरांची कथा पुढील अध्यायात सांगणार आहे असे महीपती म्हणतो—

तेचि कथा नवरस उत्पत्ती । वाढीन आर्ताचिये ताटीं
सभाग्य प्रेमळ जे क्षुधार्थी । तेचि सेविती निजप्रेमे ॥ भ० वि० १५५

जे कथारस सेविते जन । ते अक्षयपदीं राहिले जाण
करितां भक्तकथा श्रवण । जन्म मरण निवारे ॥ भ० वि० ८–३

गंगेची उपमा द्यावी यासी । तरी तेही न तुकेच कथारसीं
जें कवनीं घ्यावें त्रिवेणीसी । मोक्ष जीवासी तें होय ॥ भ० वि० ८–४

नवरसांनी युक्त अशी कथा मी, जे लोक इच्छुक आहेत त्यांना देईन. जे प्रेमळ आणि भुकेले आहेत तेच या नवरसनिर्मितीचे ग्रहण करतील. जे हा कथा-रस सेवन करतील ते अक्षय्यपदी जाऊन पोचतील. कारण भक्तांच्या कथा ऐकल्या-मुळे जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होता येते. या कथारसाला गंगेची उपमा दिली तरी ती तोकडीच पडेल; म्हणजे गंगेपेक्षा कथारसाला अर्थात् रसोत्कटतेलाच महीपती महत्त्व देतो.

अशा प्रकारे, कर्तृत्व, वस्तृत्व, अनुभव, चातुर्य, ईश्वरगुणवर्णन, उत्स्फूर्तता, दृष्टांतरीती, कथानुसंधान, कविकौशल्य आणि रसोत्पत्ति या गोष्टी काव्याला आवश्यक आहेत, हे महीपतीने निरनिराळ्या प्रसंगी सांगितले आहे. काव्याला आवश्यक असलेल्या या सर्व गोष्टी एकत्रितपणे लक्षात घेतल्यास महीपतीच्या मते काव्याच्या मुळाशी असलेले प्रमुख लक्षण कोणते, या विषयी कल्पना करिता येते.

कवीचे कर्तृत्व हे कस्तुरीच्या सुवासाप्रमाणे स्वयंभू तर खरेच, परंतु काव्य-साधकाने संतांच्या कडून प्रेरणा घेऊन आपल्या बुद्धीचा विस्तार करावयास हवा. कवी जसे जीवन जगेल तसे त्याचे काव्य होईल. हा जीवनानुभव त्याला स्वत:च्या आयुष्यातून जितका घेता येईल त्यापेक्षाही संतचरित्रातून अधिक येईल. शिवाय वाणीचे खरे सार्थक म्हणजे तिने ईश्वराचे किंवा ईश्वरसदृश संतांचे गुणगायन करणे हेच होय. काव्याचा खरा गाभा तो हाच होय. कवीची ओबडधोबड वाणी किंवा त्याने दिलेले चार दृष्टान्त ही केवळ बाह्यलक्षणे होत. कथेचे अनुसंधान, कवीचे लाघव आणि दृष्टान्तादि बाह्य सामग्री हे काव्याची अभिव्यक्ति करितात. परंतु काव्याचे खरेखुरे एकमेव लक्षण किंवा काव्याचा आत्मा म्हणजे नवरसोत्पत्ति होय. आणि त्यातल्या त्यात भक्तकथारस हा तर अमृतापेक्षाही मधुर आणि गंगेपेक्षाही पावन होय.

अनुक्रमणिका

पुस्तक–परीक्षण :

नवी मळवाट

सौ. सुमित्रा हे. टिळक

नवकाव्यात दुर्बोधता आहे, विशिष्ट प्रतिमासृष्टी आहे. मुक्तिबोध त्याला अपवाद नाहीत. नवकाव्यावरील हे आक्षेप त्यांनाही मान्य आहेत. तथापि त्यांचे दुर्बोधतेचे स्वरूप समजण्यासाठी, संदर्भ, पार्श्वभूमी लक्षात घेणे जरूर आहे असे ते म्हणतात. कारण ही दुर्बोधता परिस्थितिजन्य आहे आणि विशिष्ट प्रतिमासृष्टी ही व्यवहार व भावना यांच्या एकरूपतेतून जन्मलेली आहे. म्हणजेच त्या प्रतिमा व दुर्बोधता ही ज्या परिस्थितीतून निर्माण झाली त्याची तपासणी केली म्हणजे त्याचे गांभीर्य, त्याचे औचित्य कळते. आपोआप प्रतिमा उलगडते. काव्याचा अर्थ समजू लागतो. मागच्या संदर्भाच्या योगाने नवकाव्याची दुर्बोधता कमी व्हायला मदत होते.

प्रस्तुत संग्रहातील मुक्तिबोधांची कविता वरवर पहातांना थोडीशी (इतर नवकाव्याइतकी नव्हे) दुर्बोध वाटते. शब्द वा ओळी यांचा अर्थ कळतो पण दोन कडव्यांमधली सुसंगती सापडत नाही. या अर्थाने त्यांचे काव्य दुर्बोध आहे. त्याची पार्श्वभूमी समजल्याखेरीज या सर्वातून कवीला नक्की काय म्हणावयाचे आहे, याचा निश्चित बोध होत नाही. त्याची पार्श्वभूमी समजल्याशिवाय प्रत्येक कल्पनेत जो एक व्यक्तिगत (Personal) आणि सामाजिक (Social) स्पर्श आहे. त्याची मर्यादा, व्याप्ती, आवाका कळल्याशिवाय त्यांचे काव्य कळणार नाही, पिळवणुकीने त्यांच्या हृदयाला पडलेला पीळ दिसतो तेव्हाच त्यांच्या काव्यातली सुसंगती, शब्दांची धार उकलते. बीभत्स, भयानक रसांचा आविष्कार मनाला पटतो. तेव्हाच गडद काळा, पिवळा, लाल रंग त्यांच्या रेखाबिंदूसहित उठावदारपणे डोळ्यापुढे स्पष्ट होतो. मुक्तिबोधांचे काव्य वाचून डोळ्यासमोर काळ्यापिवळ्या पट्टयांचे एक पटल उभे रहाते हे खरे आहे. तथापि वरवर हे पटल डोळ्याला अंधारी आणणारे असले तरी सूक्ष्मपणे पाहिल्यास कळेल की तो लाल रंग रक्ताचा, बंडाचा, क्रांतीचा, पिवळा रंग तेजाचा आणि आशा-किरणांचा, उरलेल्या काळ्या पट्टयात अंधार, सामाजिक दुःखे, दारिद्रय, उपासमार, नीतिभ्रष्टता सारे दृग्गोचर होईल.

मुक्तिबोधांच्या मते काव्यातील दुर्बोधता ही अशा प्रकारे कमी होते. उलट त्यात नवेपणा दोन प्रकारचा ! एक आशयाचा आणि दुसरा अभिव्यक्तीच्या

पद्धतीतला ! सर्व जुन्या नव्या कवींनी याचाच पाठपुरावा केलेला आहे. मर्ढेकरांनी देखील भावनानिष्ठ समतानता (Emotional Equivalance) या शब्दात हाच अभिव्यक्तीतील नवेपणा सांगितला आहे. समाजात येत असलेल्या नव्या प्रवाहाचे स्वागत नवकवींनी केले. आपोआपच नवा जाणवू लागलेला पण पूर्वी अप्रकट असा आशय नवकाव्यात येऊ लागला. काव्य नवे झाले. या सामाजिक नव्या बदलाचे स्वागत करणारे अनेक कवी झाले. विशेषतः त्यातही नव्या आशांचे उद्‌गाते जे कवी झाले त्यात कुसुमाग्रज, अनिलांप्रमाणे मुक्तिबोधही अग्रभागी आहेत. मध्यमवर्गाला जाणवू लागलेली विफलता, दलितवर्गाची विकलता त्यांनी चित्रित केलीच, पण त्यातही या असंतोषातून काही नवे उत्साहमय, तेजोमय जन्म घेणार आहे हा दावा त्यांनी हिरिरीने मांडला आहे.

"हुष्यार रे ! जन्म घेते काहीसे नवीन."

ही त्यांची आशावादी घोषणा आहे. रुधिराच्या लाल सड्यातच तळमळत पण नाशातून, पीडेतून नव्या मनूला आवाहन करणे, त्याचे स्वागत करणे, हा त्यांचा पिंड आहे. या जुन्या नव्या संघर्षाच्या संक्रांतिकालात मानवी मनाच्या यातना दाखविणे, त्यांचे प्रतिनिधित्व करणे, त्यांचा उच्चार करणे, त्यातून मुक्तता करण्यास आशावादाचा संदेश देऊन त्यासाठी झटणे हा त्यांचा अभिनिवेश आहे.

कवीचे मन पेटलेले आहे. चोहोकडे जी आग लागलेली आहे त्याचे कारण काय त्याचा विचार, त्यातून मुक्त होण्यासाठी त्यावरील उपायांचे चिंतन आणि तत्संबंधी कृतींचे मार्गदर्शन अशी ही नवकाव्यातील विचारांची एक सुसंगत मालिका आहे, असे ते म्हणतात. तेव्हा ते आत्मनैपदी बोलत असावेत असे वाटते. त्यातून कोणी आशावादी तर कोणी निराशावादी दृष्टिकोन पुढे मांडतो. स्वतः मुक्तिबोधांना उदात्त ध्येयांचा चुराडा (राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पातळीवर) जाणवला. जीवनातील उणीव, स्वप्नभंग जाणवला. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर जुन्या आस्था व नवी विद्रूपता यांच्या संघर्षातून निर्वाणीचे क्षण (Crisis) निर्माण होत आहेत. त्यांच्याही मनात हाच प्रक्षोभ अवतरला. काव्यरूपाने त्याचा स्फोट झाला. हे त्यांच्या 'नवी कविता', 'भविष्यातल्या गर्भातल्या बाळाचे रुदन', 'माझ्या पीडेला अर्थ येईल', 'लाल कंदिल', 'अंत आहे तसा आरंभ आहे.' 'छंदाच्या लहरीवर लहरी' इत्यादी काव्यांतून स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेले दिसते.

मुक्तिबोधांचा खरा रोख याही परिस्थितीत केवळ नैराश्यवादी गीतेच आळविणाऱ्या कविसमुदायावर, या कलावंतांवर आहे ! वैफल्याची चित्रे रेखाटणारा कवि, चित्रकार, ती गाणी आळवणारा गायक, लिहिणारा साहित्यिक हा या

सर्वांचा मिळून झालेला जो कलावंतांचा वर्ग तो एका दडपशाही भांडवलशाहीच्या झाडावर उगवलेल्या वांडगुळाप्रमाणे परपुष्ट आणि शोषक आहे असे त्यांचे म्हणणं आहे. पण या कलावंतांनी प्रत्यक्ष आशावाद रंगवला आहे तरी त्या वैफल्याचेच चित्रण विदारकपणे, भयानकपणे करून जगात मानवी मनात त्याबद्दल तिटकारा निर्माण करणे हे कार्य यशस्वी रीत्या पार पडले आहे. नवीन युगाच्या स्वागतासाठी त्यांनी मनोभूमि तयार केली हेही नसे थोडके ! पूर्णपणे प्रकट आशावाद त्यांनी दाखवला नसला तरी त्याची अन्य काही कारणं असतील. पण केवळ तेवढया-वरून त्यांची सामाजिक विफलतेची जाणीव तीव्र नव्हती, त्यांना दीनदलित, पीडित यांच्याबद्दल सहानुभूति नव्हती असे म्हणता येणार नाही. याच रेखाटनातून मुक्तिबोधांच्या आशावादाचा विकास होऊन त्याचे तेजस्वी स्वरूप त्यांच्या काव्याचा एक अविभाज्य घटक झाला हेही खास करून अभिनंदनीय आहेच. म्हणूनच मुक्तिबोध स्वतः आशावादी असल्याने या निराशावादी धारेची त्यांना अत्यंत चीड आहे. कारण काव्याचे हे तुच्छतावादी (Cynic) स्वरूप एखाद्या गढुळलेल्या डबक्यासारखे. ते त्याला प्रगतीकडे नेऊ शकत नाही. उलट अधिका-धिक जळमटे मात्र निर्माण करील. त्यांचा हा दृष्टिकोण पटणारा असला तरी या पाण्यातही एक वडवानळ आहे, तो सुप्त आहे हेही त्यांना जाता जाता कबूल करता आले असते. असो. त्यांच्या मते मागील विचारसरणी व्यक्तिवादी, अहंवादी आणि दुसरी अर्थात समाजवादी, मानवतावादी. म्हणजेच स्वतः मुक्तिबोधांची ! मुक्ति-मुक्तिबोधांच्या कवितेचा नायक हा स्वार्थी, वैयक्तिक बंधनात गुरफटणारा नाही' बांधवाविषयी त्याला सहानुभूति आहे. त्यांच्यासाठी समर्पण करण्याची त्याची तयारी आहे. त्याची विचारसरणी आशेवर फोफावणारी ! सहप्रवाशाची त्याची भूमिका ! हीच भूमिका अनिलांनी प्रकट केली आहे म्हणूनच की काय या दोघांच्या काही कवितांत व विचारांत विलक्षण साम्य आढळते. सुप्त 'ज्वालामुखी' 'मानवता' इत्यादि कविता मुक्तिबोधांची ही कविता वाचताना अपरिहार्यपणे आठवतात.

'नवी मळवाट'चे काही विभाग करणे आवश्यक आहे. तथापि ते केवळ सोयीसाठी ! एरवी, मुक्तिबोधांची तळमळ वेदना, प्रक्षोभ यांचा एक मेळ सदैव ह्या सर्व काव्याच्या पार्श्वभूमीवर आहेच. त्यांचा कवि प्रेमिक, तत्त्वज्ञ, क्रांतिकारक, रसिक. सारेच क्रांतिमय. व्यष्टीकडून समष्टीकडे जाणारे, आशावादी ! त्या दृष्टीने त्यांच्या काव्यात हा समाजवादाचा, मानवतेचा, अन्यायविरोधाचा आणि आशा-वादाचा एक धागा एकसारखा सुसंगतपणे अनुस्यूत आहेच. तथापी विभाग पाडणे सोयीचे आणि सुलभ आकलनासाठी आवश्यक ठरते.

मुक्तिबोधांच्या काव्यविषयक कल्पना देखील क्रांतीशी जखडल्या आहेत. स्वतःलाच उद्देशून किंवा आत्मचरित्रात्मक असे अनेक उल्लेख त्यांच्या काव्यात

आढळतात. त्यातूनच त्यांचे विचारही सहजपणे कळतात. म्हणून त्यांच्या कवितेचे वर्णन जणु 'पिऊनिया पोसली जी नवे तुपार' या शब्दात ते करतात. त्यांची कविता म्हणजे अमर्याद यातनांच्या डहाळीला लागलेलं प्रक्षोभाचं फूल आहे. पण हा प्रक्षोभ देखील वैफल्यवादी नाही. आशारूपी नवा सूर्य धगधगतो आहे.

"क्रुद्ध नवा प्रचंड मार्तंड उरात पेटला आहे
महाप्रखर त्याचा प्रकाश माझ्या उरात कोंदला आहे
प्रकाशाचिया सागरावरी कोसळतात काळे पहाड."

हे काळे पहाड अंधाराचे, अन्यायाचे असावेत. प्रकाशापुढे ते नामोहरम झाले, त्यांच्या घर्षणाने जे ध्वनी निर्माण होतात,

"त्याच ध्वनीनी प्रतिध्वनींनी प्रकाशति नावरे आता
उरी जन्मते नवी कविता."

हा ओघ सीझरसारखा कुशी फोडून बाहेर येतो. कारण हृदयात एक 'नवा सविता' पेटला आहे.

क्रांतीला कवी कृतीने मदत करू शकत नाही याचो खंत वाटून कवि म्हणतो.

"केवळ पुस्तकी क्रांतीचे आम्ही । यांत्रिक गीताचे कागदी कवि"

अनुकरण करणारे पण मूळचा प्रक्षोभ नाही. म्हणूनच

"वंचित मानवी नदाच्या प्रचंड । गतीच्या जाणिवेपासून आम्ही
वंचित मानवी संघर्षाचिया त्या महान विश्वापासून आम्ही ॥'

हे नष्ट व्हायला हवे म्हणून ते तळमळून ते सांगतात.

"बोथट दुबळ्या वाणीत आणारे
अत्यंत तीक्ष्णशी कट्यारी धार ।"

त्याशिवाय क्रांतिकालात कवि वा कलावंतांना आधार नाही. अर्थ नाही. प्रत्येक कलावंताने केवळ स्वतःच स्वतःच्या कलेत रंगून जाणे ही त्याच्या कलेची पूर्तता नव्हे तर ती कला समाजाच्या कल्याणासाठी त्याने राबवली पाहिजे ही त्यांची विचारसरणी आहे कवीने स्वप्नभंगाने निराश होणे त्याला शोभत नाही. स्वतः त्यांच्या काव्याचा अनुभव-निर्मितीचा अनुभव

'दाह पोचला पराकोटीला'

आणि म्हणून—

'वक्ष भेदुनी छंद निघाले'

या शब्दात त्यांनी केले. हे त्यांच्या प्रामाणिक, कलावंत पण समाजवादी, समष्टीरूप मनाला शोभेसेच आहे. तरीसुद्धा शब्दांच्या अपुऱ्या सामर्थ्याची त्यांना चीड आहे !

रुखरुख आहे. जेवढचा प्रमाणात तडफड आहे, क्षोभ आहे, तळमळ आहे, तेवढचा प्रमाणात प्रकट करायला शब्द अपुरे आहेत

एकही छंद !
माझ्या मनाचा निर्बंध प्रवाह बोलका करु न शके

किंवा

हृदयाचिया उंच गगनी ! आशयमेध तरंगतात
बांधू कसा हो त्यांना छंदात

हा त्यांचा प्रश्न त्यांची ही चीड व्यक्त करतो. म्हणून चिडून ते जुन्याचा निषेध करतात. तसे शब्दावरही हत्यार उपसून म्हणतात,

' म्हातारे शब्द '
झिजल्या नाण्यासमान झिजून व्यर्थ झालेले--
निःसत्त्व शब्द ! म्हातारे शब्द !
कष्टाने चढती छंदाची चढण
मरण मिरवी जीवन म्हणून !

त्यांचा प्रेमिकदेखील व्यक्तिवादी नाही. समाजकल्याणाआड येणारे क्रांतिवाद्याला बांधून ठेवणारे प्रेम त्यांना नको आहे. हा प्रेमिक यंत्रयुगाने विभिन्न परिस्थितीने गांजला आहे, अन्यायाच्या जाणिवेने तडफडतो आहे. यांत्रिक जीवनाच्या चाकोरीतून बाहेर पडायला येत नाही म्हणून वैतागला आहे. पण तरीही बदलाचे, नव्याचे प्राणपणाने स्वागत हाच त्याचा धर्म.

कधी कधी आपल्या प्रेयसीची आपल्या ध्येयापायी आपण फार हेळसांड करतो असे वाटून तो हेलावतो. उद्या तुझ्या मनासारखा वागेन असे तिला आश्वासन देतो. तिच्या प्रेमाचे कौतुक करतो. मागून हळहळ नको म्हणून तिच्या आलिंगनात बद्ध होऊन स्वर्गसुखात विलीन होण्यास तयार होतो. पण सारे तेवढेच. उसने नाही पण स्थायी स्थिर नाही. प्रेयसीच्या मग्न मनाची ती एक क्षणिक समजूतच ! पिंड क्रांतीकडे ओढ घेणारा ! हे चित्र कवि फार समर्पक शब्दात साकार करतो. आज काय ती हौस भागवून घे असे म्हणताना तो म्हणतो,

' सतत प्रवासी उठेन मग मी
हाक ऐकुनी दूर कुणाची
अनावर मला ओढिल माया
दूरदूरच्या गे वस्त्यांची

जनःसागरी मिळेन तेव्हा
सापडेन ना कधी निराळा
मला बोलविल दूरदूरच्या
राजपथाचा गरम धुरोळा

त्या इशाऱ्याआड तुझी प्रीति येऊ शकत नाही. येऊ नये म्हणून फक्त आज हौस भागवून घे !

प्रीतीसंबंधी त्याची कल्पना मात्र

'शरीरे दोन ती प्राण तो एकच
हृदये दोन ती धड्धड् एकच'

अशीच आहे.

क्वचित् हिवाळ्याचा गूढ अंधःकार कवीला स्मृतिगव्हरात नेतो तेव्हा क्षणभर कवीमधला प्रेमिक विकल होतो. तरीपण हा क्रांतिपथस्थ मोठा सावध आहे. क्षणभराचा स्नेह अमर ठरू नये म्हणून त्या मुग्धेला —

दुर्गम अतिशय पंथ सुनिश्चित
पुढेच पाऊल नित पडते
सरळ किशोरी जीव लावी ना
विसर क्षणाचे मृदु नाते ।

कारण माझ्या 'पाठीशी सुखदुःखाचे ओझे' आहे असा हा इशारा देतो.

कवीला क्रांतिमय जीवनाने मारले आहे. म्हणूनच त्याची अवस्था—

एकही स्पर्श
माझीया तनूत स्मृतीचा रोमांच आणू ना शके !

किंवा

तुझेही चारुत्व निसर्गप्रेयसी
झालेली जखम बांधू ना शके

अशी झाली आहे.

"यंत्र आहे मी प्राण यांत्रिक
अगतिक बळी परिस्थितीचा
चोविस तास गुलाम आहे
मानवनिर्मित महायंत्राचा
तुझ्यापासून, फुलापासून,
प्रीतीपासून निर्वासित मी ।"

ही कवीने वर्णन केलेली चाकोरी आज कोणाला अपरिचित आहे ? म्हणूनच

मुक्तिबोधांचे काव्य एवढ्यापुरते तरी वास्तववादी आहे. त्यात जीवनाचे सूक्ष्म अनुभव अनुभवले उत्कटतेनं ! टिपलेही तसेच. त्या जीवनातली विसंगती, विरूपता यांचा हा पीळ किती स्पष्ट आहे. माणूस तसाच मरतो, पण त्याचा पीळ उलगडत नाही.

आत्म्याआत्म्याचे नेत्रमीलन होतच नाही
जिवाशिवाची गाढालिंगने होतच नाही
गळ्यात गळा, नेत्राशी नेत्र, वक्षाशी वक्ष भेटतच नाही.

तकेच काय. .

तासभर बोलायचीही फुरसद कधी होतच नाही

अशी चाकोरी !

याच संदर्भात मुक्तिबोधांचे यंत्रयुगातील आचारविचार, नीतिभ्रष्टता यांचे वर्णन हृदयाला पटते, पीळ पाडते. किंबहुना यंत्रयुगात वैतागलेल्या सर्वच नव-कवींनी हे वर्णन केले आहे. त्या वर्णनात क्वचित् विकृती, ओंगळपणा, बीभत्स-पणा, अश्लीलता सुद्धा आहे. पण त्या सर्वामागे चीड, घृणा, मुक्ततेची तळगळ आहे हे विसरता येत नाही. म्हणूनच ती कुरूपता काव्यसौंदर्याला मारक रत नाही.

मर्ढेकरांनी देखील हे वर्णन सर्व तऱ्हांनी पण एक प्रकारच्या पोटतिडिकेने केले आहे. या सर्व बीभत्स गोष्टींचा शेवट होऊ दे अशी परमेश्वराची आर्त विनवणी देखील केली आहे. पण इथेच या दोन कवीत फरक आहे. या विरूपतेच्या नाशासाठी अव्यक्त परमेश्वराचा धावा मुक्तिबोध कधीही करीत नाहीत. त्यासाठी ते स्वत:मधील तेजाला विनवतात, जागवतात. ते विनवतात पौरुषाला, पराक्रमाला प्रयत्नाला, साम्राज्य–चरकात पिळल्या जाणाऱ्या बांधवांच्या सुप्त शक्तीला !

कारण त्यांच्या मते समाजातल्या अन्यायाला, यंत्राच्या गुलामगिरी आणि जीवनातील वैफल्याला माणूसच जबाबदार आहे. त्या माणसाच्या स्वार्थी प्रवृत्तीशी त्यांचा विरोध आहे. त्या प्रवृत्तीला ठेचण्याचा त्यांचा आवेश आहे. 'नरेच केला हीन किती नर', 'देवदानवा नरे निर्मिले' याच कल्पनांचा पुरस्कार ते करतात. म्हणून यंत्रावर नाही, सत्तांध, मदांध, द्रव्यांध अशा यंत्राच्या मालकांवर, मांडवल-दारांवर त्यांचा राग आहे.

मुक्तिबोधांचे हे चित्रण थोडे अतिरंजित वाटते. जग मुळांत सुंदर.पण मानवाने त्याचा विघाड केला, या जगांत. म्हणूनच

'सुकुमार मानवाचा झाला चोळामोळा ।
पोटासाठी विकतात पोटचाच गोळा ।।'

इतकेच काय, जिथे साम्राज्यसत्तेचा चरक चालतो त्या जगात व नरकात फरक नाही. माणसे प्रेतवत् झाली. त्यांच्या स्वप्नांना सुद्धा विशालता वा भव्यता नाही. पोटभर भाकरीचे ते क्षुल्लक स्वप्न पण तेही पुरे होत नाही. नीतिमत्ता फक्त काव्यात, ग्रंथात. प्रत्यक्षात तीच विकून पोट जाळावे लागते. व्यक्तीत्वाचा विकास होण्यापूर्वीच माणसाचा बळी दिला जात आहे.

स्वप्नातही दलितांचा विचार, कवीला सोडीत नाही, इतकी तळमळ आहे. 'शिशिरातली पौर्णिमा', स्वच्छ प्रकाशरेखा दारिद्र उघडे पाडते म्हणून कवीला भेसूर वाटते. त्या दारिद्र्याची जाणीव त्यांचे मन करपवते म्हणूनच सौंदर्याची भयानकता हा वदतोव्याघात त्यांना सहज कळला.

या जगात चांगले वाईट यांचे मिश्रण त्यांना दिसते. विसंगती विरूपता. मंदिर पवित्र, पण त्या भिंतीवर गुन्हेगारीदर्शक हातांचे छाप व अश्लील वाक्ये. देवळातला देव भाविकांच्या तेलाने तसाच श्वानाच्या अभिषेकानेही पावन होतो. लाल कंदिलाच्या रूपाने जणू कवीने आपले अनुभव साकार केले. एकाचा आर्त अभंग, एक जुगारी, एक क्रांतिवादी, चुर्गाळलेल्या देशी कागदासारख्या चेहऱ्यांचे पुरुष, वयानुरूप ओढ अपुरी वाटते म्हणून जळक्या मोहराप्रमाणे झडलेल्या पिकल्या मिरचीप्रमाणे चोपट पोरी हे सर्व कवि पाहतो.

मी त्यांची जाणीव फार तीव्र आहे. पण एवढ्यावरच थांबते तर मुक्तिबोध इतरांप्रमाणेच नवकवि, वैफल्यवादी नवकवी ठरते. पण जितके चित्रण भेसूर तितकाच त्यांचा आशावाद दांडगा आहे हे ठिकठिकाणी कळून येते. ती जाणीव तीव्र आहे म्हणूनच रक्त, मरण यांची भांति गेली आहे. म्हणूनच रक्ताचा पाऊस, मृत्यू, रक्ताचा सडा, दुःखाचे पिवळे डोळे, रक्तबिंदूप्रमाणे बल्ब, शेंदराच्या लाल जिभा, मुंडकी पेरणे, घृणेचा धगधगता भाला असलेल्या प्रतिमा सहजपणे, अपरिहार्यपणे त्यांच्या काव्यात जागोजाग पेरलेल्या दिसतात. मुक्तिबोधांचे काव्य काळचा, पिवळचा, लाल रंगाचे पटल डोळ्यासमोर निर्माण करते पण त्याने घेरी येऊ नये म्हणूनच की काय एक शुभ्र तेजाचा प्रखर दीप, आशावादाचा दीप मधून मधून पण तेजाने तळपताना दिसतो.

'अंत आहे तसा आरंभ आहे' ही त्यांची निश्चिय मनोधारणा असल्याने अडीअडचणी पार करून वर येणे हा त्यांचा धर्म ठरला, म्हणून नातलगांच्या पुण्याईने पुढे जातात. त्यांच्या प्रेमबंधनात अडकत नाहीत.

'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार' अशी त्यांची स्थिति. जीवन समर्पण करा त्याने विश्वसुंदरी हसेल. तुमच्या जीवनाचे अर्घ्य नव्या मनूला प्रसन्न करील. तुमचा त्याग, कष्ट, पीडा, यातना, समर्पण, हौतात्म्य वाया

जाणार नाही. तो नवा मनू त्यातूनच येईल. समतेची देवता त्यातूनच अवतरेल. हा त्यांचा संदेश आहे. गर्जून ते सांगतात—

'हुषार रे ! जन्म घेते काहीसे नवीन'

किंवा

आजचे हे स्वप्न उद्या वास्तव होणार

म्हणून

सशक्त व्हा पाय रोवा । उद्याचीच आण

कारण उद्याच

इतिहासाचे पालटते पान !

कोणत्याही स्थितीत, प्राणपणाने कवि स्वातंत्र्याचे, समतेचे स्वागत करतो. रक्ताची फुले पसरून, जुन्या जगताच्या नाशाचे चिताभस्म कपाळी लावून, अपमान, दैन्य, नाश, मृत्यू, पीडा सारे सोशीत कवि म्हणतो—

ये ! स्वागत ! स्वागत !! स्वागत !!!

कारण मानवाची जीवनाकांक्षा, स्वातंत्र्याकांक्षा उखडणे अशक्य आहे. एक दिवस सर्वांच्या पीडेला अर्थ येईल. जगताचे सुवर्णचक्र आता विजयपथाकडे धावते आहे. तोवर यातना आहेत. लवकरच समतेचे युग अवतरेल. धीर धर', वाईट तेवढे पाहून घाबरू नको.

'जुनाट थडग्यावरी नको गाऊ विलापिका'

त्याच थडग्याला फोडून, नवी डहाळ येते ती पहा. ग्रहणाचे चांदणे, हुतात्मे यातना नको पाहू ! मागून येणारा सूर्य, नवी पिढी, आनंद पहा. त्याच्या स्वागतासाठी सारे सोस पण मरू नको. चिडू नको. त्यागाला, कुरूपतेला, भयानकतेला तोंड द्यायला सिद्ध हो. नक्की आशा ठेवा नव्या सूर्याची !

मुक्तिबोधांनी हा आशावाद दाखवीतच मानवाला आपली मर्यादा सोडण्याचा आदेश दिला. स्वार्थासाठी माणूस स्वतःभोवती एक वलय करतो, त्याने आत्मनिष्ठ होता कामा नये. त्याचा अणु, हुषारी, कला, कसब सारे काही समाजाच्या, जनतेच्या उपयोगी पडावे.

कारण—

'समष्टीचे रक्त तुझ्या धमन्यांत प्रवाहित
समष्टीच्या चैतन्याने तुझे प्राण प्रकाशित ।'

निदान व्यष्टी सोडून समष्टीप्रत जा हा संदेश इतके जरी प्रत्येकाला आचरता आले तरी मुक्तिबोधांचे काव्यश्रम सफल झाले असे म्हणता येईल.

कविश्रेष्ठ वि. दा. सावरकर

प्रा. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे

: १ :

अनादि मी, अनंत मी, अवध्य मी मला
मारिल रिपु जगति असा कवण जन्मला...

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मृत्यूची वार्ता कानावर येताच आठवल्या त्या त्यांच्या वरील अविस्मरणीय ओळी. आत्म्याच्या अमरत्वाचे तत्त्वज्ञान पूर्णतः पचवून केवळ त्यांच्या कृतार्थ मनाने काढलेले हे उद्‌गार म्हणजे कवीने प्रतिभेच्या लहरीत काढलेले 'शुष्क' उद्‌गार नव्हते. त्या उद्‌गारांना महिरप होती त्यांच्या तेजस्वी व समर्पित जीवनाची ! महापुरुषांना शरीर नसते. शरीर असते ते सामान्य संसारी जनांना. महापुरुषांना असते केवळ व्यक्तित्व......ज्यामुळे त्यांचेच केवळ नव्हे तर, ते ज्या कालखंडात राहतात त्या कालखंडाचेही, जीवन उजळून जाते !—२३ फेब्रुवारी १९६६ रोजी कालगजेंद्राने सावरकरांच्या जीवनाचे 'कमलपुष्प' श्रीहरी-साठी उपटून नेले असले तरी त्या कमलपुष्पातील सुगंध चिरकाल टिकणार आहे यात शंकाच नाही. सावरकरांच्या साऱ्या वाङ्‌मयातून त्यांच्या व्यक्तित्वाचा हा सुगंध दरवळतांना दिसून येतो !—त्यातही त्यांचे काव्य त्यांच्या अलौकिक व्यक्तित्वाच्या रंगाने रंगलेले असल्याने मराठी काव्यसृष्टीत नेहमीच 'अम्लान' स्वरूपात टिकेल याबद्दल कुणीही संदेह बाळगणार नाही.

: २ :

सावरकर हे क्रांतिकारक होते ..प्रखर देशभक्त होते, सुधारकाग्रणी होते. राजकीय नेते होते आणि कादंबरीकार व नाटककार सुद्धा होते. सावरकर या सर्व नात्यांनी प्रसिद्ध होते. पण हे सर्व असून सुद्धा सावरकरांचा मूळ पिंड हा कवीचा महाकवीचा होता, हे विसरता येत नाही. लोकमान्य टिळकांप्रमाणेच स्वा. सावरकर राजकारणात पडले ही विशिष्ट परिस्थितीची लीला होती ! १९१३ साली कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर यांना नोबेल प्राइझ मिळाल्याची वार्ता ऐकताच स्वा. सावरकरांनी अंदमानमधून त्यांचे अभिनंदन करतांना याचा स्पष्ट उल्लेख केला आहे ! ते म्हणतात, " मला महाकवी व्हायचे होते. परंतु भारतमाता सैनिकबाष्प-रथातून आपली राजधानी जिंकून घेण्यासाठी जेव्हा निघाली तेव्हा आपल्या

कवित्वाने तिच्या महान कार्यात साह्य करण्याला मी सरसावलो. तथापि, कार्यात कवींची उणीव नाही; उणीव आहे ती त्या समररथाच्या यंत्रात राबणाऱ्या त्या यंत्राला गती देणाऱ्या सेवकांची. तर तू तेथे जा. अशी तिची आज्ञा झाल तिच्या आज्ञेने मी कवित्वाच्या डव्यात न शिरता दुसऱ्या कर्तव्याचा स्वीकार केला. ह्याच कवितेतील दुसरी कल्पना अशी "भारतमातेने तिच्या विमोचनास्तव ज यज्ञ चालला होता, त्याचे पूजनार्थ एक कळी वाहिली व दुसरी तिने केसा खोवली. केसात खोवलेली कळी विकसित होऊ शकली—त्या गुलाबकळीचे पू प्रफुल्लित गुलावपुष्पात रूपांतर झाले. हे, भारतमातेच्या केशकलापातील 'फुलत्या गुलाबा !—यज्ञात जळणारी ही दुसरी कळी तुझे अभिनंदन करीत आहे." रवींद्र नाथांची व आपली जातकुळी एकच आहे असे जेव्हा सावरकर सांगतात, तेव्हा त्यांच्या या मूळ वृत्तीचे दर्शन झाल्याशिवाय राहात नाही.

सावरकरांचा क्रांतिकारक वृत्तीचा जन्मही याच कविप्रवृत्तीतून झाला आहे. कारण कवीही क्रांतिकारकच असतो. तो स्वातंत्र्यप्रिय असतो. बंधन कोणतेही असो, त्या बंधनाचा अडथळा कवीच्या 'स्वच्छंदा'ने गाण्याच्या प्रेरणेला कधीच सहन होत नाही ! (कवी हा द्रष्टा असतो. त्यामुळेच त्याच्या दिव्य दृष्टीला जे दर्शन घडते ते सामान्यांना कधीच घडत नाही !) अनेकविध बंधनांनी जखडलेल्या सामान्यांना 'बंधनातीत' कवीचे शब्द म्हणूनच क्रांतिकारक वाटत असतात. सावरकरांच्या काव्यातून ज्याप्रमाणे राजकीय स्वातंत्र्याविषयीची दुर्दम्य आसक्ती दिसून येते त्याप्रमाणेच सामाजिक स्वातंत्र्याविषयीचीही दिसून येते. भावनांची उत्कटता व तरल संवेदनक्षमता या दोन्ही वृत्ती स्वातंत्र्यवीराप्रमाणेच कवीलाही अत्यावश्यक असतात ! दोघेही सारखेच स्वातंत्र्यनिष्ठ व निर्भय असावे लागतात. आदर्श प्रीतीचे वर्णन करताना महाकवी शेक्सपियर म्हणतो—

...Love is not love
which altes when it alteration finds,
Or bends with the remover to remove....

आदर्श ध्येयनिष्ठेलाही हेच उद्गार लागू पडतात. ही अभंग ध्येयनिष्ठा सावरकरांच्या ठिकाणी होती. काव्यातून त्यांच्या या ध्येयनिष्ठेचे व साऱ्या व्यक्तित्वविशेषांचे मोठे सुंदर दर्शन घडून येते. मृत्यू ही केवढी भीषण कल्पनान पण त्या मृत्यूचेही मोकळ्या मनाने स्वागत करण्याएवढी निर्भयता त्यांच्या वृत्तीत आहे. १९११ ते १९२१ या कालावधीत अंदमानमध्ये सावरकरांची प्रकृती एकसारखी खालावत होती. आकाशात विहार करणाऱ्या गरुडाचे पंख कापू. टाकल्यावर त्याला जसे वाटेल तसे सावरकरांना वाटू लागले. महिनोगणती अंथरुणास खिळून राहण्याऐवजी मरण येईल तसे बरे असे विचार त्यांच्या मनात

अनुक्रमणिका

येत.—आणि एकदा ते मरण खरोखरीच येत आहे असे त्यांना दिसले. मृत्यूच्या आगमनाची ती चाहूल लागताच सावरकरांनी काढलेले उद्गार त्यांच्या निर्मय व्यक्तित्वाचे केवढे रेखीव दर्शन घडवितात ! ते मृत्यूला उद्देशून म्हणतात—

ये मृत्यो ! ये तू ये, यावयाप्रती
निघालाचि असशिल जरि ये तरी सुखें !
कोमेजुनि जावया भिवोत ही फुलें
ही द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया
भ्यावें ते का म्हणुनी तुजसि परी मी ?

मरणाचे असे हसतमुखाने स्वागत सावरकर करू शकतात याचे कारण भारतीय तत्त्वज्ञानाच्या 'जीवना'ने बहरलेले विचारी मन त्यांच्याजवळ होते. 'मानवीय वंशाच्या गौरवार्थ' झटण्याचे कर्तव्यकंकण बांधले असल्याने व ऋषि-ऋण, पितृऋण व देवऋण ही तिन्ही ऋणे 'यथाशक्ती यथापरिस्थिती' फेडल्याची जाणीव मनाला जागृत असल्याने त्यांना मरण भयंकर वाटत नाही. भगवद्गीतेतील निष्काम कर्मयोगाचे आचरण प्रामाणिकपणे केल्यामुळे--

'मरणाची वेस जयामाजि उघडते
त्या अदृष्ट नगरातिल अति सुरम्य ते
राखवूनि ठेवियले असति बंगले
आर्षींची आम्हास्तव भरुनिया अम्ही
कर्माच्या, धर्माच्या निर्यत विसारा'

असे आत्मविश्वासाचे उद्गार ते सहज काढू शकतात. फार काय, 'तरि मरणा ! मरण न तू ! मरण मुक्तिची !' असे प्रमाणपत्र ते मृत्यूला देऊ शकतात ! विशेष लक्षात घ्यावयाची गोष्ट म्हणजे सावरकरांची ही वृत्ती कारागृहवासातील नैराश्यामुळे निर्माण झालेली नाही ! १९०९ साली आपल्या बंधूंना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाल्याचे व कनिष्ठ बंधूंना अटक झाल्याचे वृत्त त्यांच्या वहिनींनी त्यांना कळवले तेव्हा ती वार्ता ऐकून त्यांना विषाद न वाटता धन्यताच वाटली !—आपल्या दु:खी वहिनींचे सांत्वन करताना त्यांनी

'धन्य धन्य अपुला वंश । सुनिश्चयें ईश्वरी अंश
कीं रामसेवा-पुण्य-लेश । आपुल्या भाग्यी लाघला'

असेच धन्यतेचे उद्गार काढले आहेत. इतकेच नव्हे तर, आपल्या शेवटच्या मृत्युपत्रात —

'हें काय, बंधु असतो जरि सात आम्ही
तत्स्थंडिलींच असते दिधले बळी मी।'

असे धीरोदात्त उद्गार काढल्यावाचून त्यांना राहावत नाही.

अनुक्रमणिका

: ३ :

सावरकरांचे सर्वच काव्य म्हणजे त्यांच्या या उत्कट स्वातंत्र्यनिष्ठेचा व अलौकिक देशप्रीतीचा आविष्कार आहे. त्यांनी आपल्या काव्यरचनेला वयाच्या अकराव्या वर्षापूर्वीच प्रारंभ केला असला व जन्मठेपेच्या शिक्षेतून मुक्त होऊन रत्नागिरी येथे स्थानबद्ध असतानाही त्यांचे काव्यलेखन सुरू असले तरीही त्यांच्या खऱ्या कवित्वाला बहर आला तो १९०४ ते १९२४ या वीस वर्षांत. त्यांतही त्यांच्या अंदमानमधील कारावासाचा काळ हा त्यांच्या प्रतिभेच्या मुक्त संचाराचा काळ आहे ! जगन्नाथाचा रथोत्सव, मूर्ति दुजी ती ! चांदोबा चांदोबा ! भागलास का ?, आत्मबळ, मरणोन्मुख शय्येवर अशी कितीतरी सुंदर काव्ये त्यांनी याच काळात लिहिली आहेत. अंदमानच्या अंधेरीतील त्यांचे जीवन कसे खडतर होते याची अंगावर शहारे आणणारी हकीकत स्वतः सावरकरांनीच लिहून ठेवली आहे. ती हकीकत लक्षात घेतली म्हणजे शारीरिक आपत्तींचा भीषण वणवा धगधगत असताही त्यांच्या अंतःकरणातील कवित्वाचे सुवर्णकमळ असे अम्लान राहिले याचेच आश्चर्य वाटते ! —पण आश्चर्य तरी का वाटावे ? शारीरिक बंधने जितकी जाचक...तितकीच आत्म्याची संचारशक्ती अधिक असे साऱ्याच लोकोत्तर व्यक्तींच्या बाबतीत दिसून येते ! लो. टिळकांना गीता-रहस्यासारखा अमोल ग्रंथ लिहायला 'मंडाले' येथील तुरुंगात जावे लागले, याचा तरी अर्थ काय ?

: ४ :

'काव्य म्हणजे उत्कट भावनांचा सहजाविष्कार' ह्या वर्डस्वर्थच्या काव्य-कसोटीवर सावरकरांचे काव्य घासून पाहिले असता ते पूर्णपणे कसाला उतरते, असे दिसून येईल! —त्यांच्या काव्यातून त्यांच्या चिंतनशील वृत्तीचे दर्शन अनेकदा घडते. मात्र ही चिंतनशीलता मूळ भावनेच्या प्रवाहाशी एकरूप झाल्यामुळे कुठेच बोचत नाही ! – त्यांचे काव्य वाचताना जणू भावनांच्या उत्कट लाटांवर रसिकाचे मन तरंगू लागते. त्या उत्तुंग लाटा रसिकांना या लौकिक जीवनाहून कितीतरी उंच...उदात्त अशा स्वर्गीय वातावरणात नेऊन सोडतात. सामान्यांना असंभाव्य वाटणारा ध्येयवाद सावरकांचा नित्य जीवनातील एकमेव सहचर होता. त्यामुळे या ध्येयवादाचे दिव्य शिवधनुष्य सहज तोलून धरणारे त्यांचे व्यक्तित्व काव्यातून प्रगट होताच रसिकांनी स्तिमित होऊन जावे यात आश्चर्य कोणते ?

: ५ :

पण केवळ भावनांच्या उत्कटतेने किंवा अलौकिकत्वानेच त्यांचे काव्य सुंदर झाले आहे, असे नाही! —त्या भावनांचा आविष्कारदेखील तितकाच सुंदर आहे !

भव्य कल्पनाशक्ती ही सावरकरांना लाभलेली अमोल देणगी आहे. जगन्नाथाचा रथोत्सव ही त्यांची कविता वाचताच त्यांच्या प्रतिभाशक्तीला केवढी 'भव्य' दर्शने घडत, हे लक्षात येईल. 'कालपथाच्या अतुट उतरणीवरून दिक्‌क्षितिजांच्या दैदीप्यमान रथात बसलेली जगन्नाथाची स्वारी जेव्हा जाऊ लागते तेव्हा नक्षत्र-कणांचा धुरळा उठतो व युगक्रोश मागे पडतात,' ही कल्पना केवढी भव्य ! —महाकवीलाच स्फुरू शकेल अशी ! सावरकर हे महाकवी आहेत, हे कुणालाही पटावे एवढी त्यांच्या प्रतिमेची उत्तुंग झेप या काव्यातून प्रगट होते. त्यांनी स्वतंत्र महाकाव्येही लिहिली आहेत. पोर्तुगीजांनी केलेल्या धर्मच्छलाच्या पार्श्वभूमीवरील शुद्धीकरणाची आवश्यकता प्रतिपादन करणारे 'गोमंतक' हे काव्य किंवा त्यांचे अपूर्ण राहिलेले 'कमला' हे काव्य 'महाकवी' या विरुदावरील सावरकरांचा अधिकार निर्विवादपणे सिद्ध करतात. (वृत्त, विषय आणि आविष्कार या सर्व दृष्टींनी प्रस्तुत काव्ये मराठीत अजोड आहेत) महाकवीच्या अंगी विशाल मानवता, व्यापक सहानुभूती, निरोगी जीवनविषयक दृष्टिकोण याप्रमाणेच कल्पनाशक्तीही उच्च दर्जाची पाहिजे !) 'कमला' काव्यात कमला मखरात बसलेली असताना कशी दिसत होती याचे वर्णन करताना—

सुरम्य मखरामाजी रमणी मग जें बसे ।
श्लोकांत कालिदासाच्या उपमाच तशी दिसे ।।

—असे ते सहज लिहून जातात. **सायंघंटा** या कवितेत 'तुरुंगातील सायंघंटेचा प्रत्येक दिवशी ऐकू येणारा नाद म्हणजे बंदिगृहरूपी पेटीमध्ये देशस्वातंत्र्याचे मूल्य म्हणून आम्ही टाकीत असलेल्या दिवसरूपी दिनाराचा नाद होय' अशी भव्य कल्पना ते व्यक्त करतात. परिणामकारक शब्दयोजना करून वर्ण्यवस्तूचे रेखीव चित्रण करण्याचे विलक्षण कौशल्य सावरकरांच्या ठिकाणी होते. 'मूर्ति दुजी ती !' या कवितेत बंदावीरांच्या दोनशे शिष्यांना ठार मारल्यामुळे त्यांच्या रक्ताचे थारोळे वधशिलेजवळ साचले होते; (त्यांच्या मृत्यूने बंदावीर गलितधैर्य होत नाही असे पाहून यवनांनी त्याच्या अल्पवयी पुत्राला ठार मारण्याचे ठरविले, असा प्रसंग आहे. त्या लहानग्याला वधशिलेकडे शत्रू घेऊन जातात तेव्हा अथांग करुणेने व्याकूळ झालेला कवी म्हणतो,

हळु न्यारे, हळु ! सांभाळूनि लेंकरू
हें लहान इतुकें कीं सांचल्या तया
रक्ताच्या डबक्यांतचि सहज बुडुनिया
जावे कीं——

बंदाच्या बलिदानाचे या कवितेतील सारे चित्रच अगदी रेखीव....... प्रत्ययकारी असे आहे.

भावनांचा लाव्हा असा रसरसत असला तरी त्यांच्या मनातील कोमल सौंदर्यसंवेदना त्याने करपली नाही. त्यांची 'तनुवेल' ही कविता तर बाल-कवींची वाटावी इतकी सहजसुंदर आहे ! सावरकरांतील, हळुवार शब्दकुंचल्याने चित्र रेखाटणारा सौंदर्यलोलुप चित्रकार या कवितेतून प्रगट होतो. ही संपूर्ण कविताच येथे देण्याचा मोह आवरत नाही. कविता अशी आहे :

सकाळीच तू तोडित असतां जाईजुइच्या फुलां
माडीवरुनी सुंदर कन्ये, पाहियली मी तुला
उंचवितां कर छातीवरि ये चोळी तटतटुनी
कुरळ केश रुळताति गोरट्या मानेवरि सुटुनि
पदर खोवले पातळ गेलें कटितटिला लगटुनी
स्मृति सखये तव मनीं माझिया संगतिच्या उठुनी
बघसी चोरटे मी तुज दिसतो वरती कां कुठुनी
दिसतांची मी हंसू उषेसम मुखि तव ये फुटुनी.
अशी सकाळी फुलें तोडितां पाहियली जैं तुला
फुलवेलीहुनि तनुवेलचि तव मोहक दिसली मला !

किती सुंदर शब्दचित्र ! सावरकरांची भाषादेखील किती सुबोध झाली आहे या कवितेत !

सावरकरांच्या काव्याचे सारे विशेष या ठिकाणी देणे अशक्य आहे.(त्यांचे काव्य वाचताना रसिकांना एका विजिगीषू व्यक्तित्वाचे दिव्य दर्शन घडते. त्यांच्या वाणीतील आवेश आविष्काराशी एकजीव झाल्यासारखा वाटतो) कल्पनाशक्तीची भव्यता, विचारांची उदात्तता, उत्कट भावनाभिव्यक्ती आणि सर्व काव्यांवर चढलेला अलौकिक व्यक्तित्वाचा दिव्य रंग यांनी स्वा. सावरकरांचे काव्य विलक्षण सुंदर झालेले आहे व त्यामुळेच सावरकरांच्या पार्थिव शरीराचे हरण मृत्यूला करता आले तरी त्यांचे काव्यशरीर मात्र मृत्युंजय आहे, हे कुणाला नाकारता येणार नाही.

रवींद्रनाथांचा दृष्टिकोन

कला आणि कलाकृती : एक टिपण

रवींद्रनाथांच्या मताप्रमाणं कलेला निश्चित आणि दृढ अशी वलयं नसावीत. आज कलेच्या बाबतीत निरनिराळ्या व्यक्तींची निरनिराळी मते मात्र दिसून येतात. कलेच्या निर्मितीत किंवा सौंदर्यात एकवाक्यता दिसून येत नाही. काहींच्या मते कला ही सर्वसाधारण जनसमुदायाला समजण्यासारखी वा रिझविण्याकरिता असावयास पाहिजे. तर कोणी म्हणतात, कलेत जीवनाचे दर्शन घडविले गेले पाहिजे. एवढयावरच ते थांबले नाहीत, तर काहींच्या बोलण्यात कलेतून जीवनाच्या समस्या सहज सुटू शकल्या पाहिजेत आणि यातूनच कलेत निरनिराळे कलावाद सुरू झाले आहेत. एकमत किंवा एकमान्यता कलावंताच्या कलाकृतीत दिसून येत नाही. मग कला म्हणजे काय किंवा कलाकृती म्हणजे काय, असा प्रश्न सहजच निर्माण होतो. तेव्हा सरळ सोप्या भाषेत तिची मांडणी करणे कठीण असले तरी ती खालीलप्रमाणे करता येईल.

कलाकृतीत प्रथम काही उद्देश्य असावयास पाहिजे. त्याशिवाय कलाकृतीची निर्मिती होऊ शकत नाही. सौंदर्याला पाहून आनंद वाटावयास हवा, त्या आनंदाची तृप्ती रसास्वादनाच्या दृष्टीने पूर्ण झाली पाहिजे, कला ही कलेकरिता वा कलेचा प्रमुख हेतू किंवा उद्देश कलानंद हा असावा. कला ही अन्य कोणत्याच कारणाकरिता नसून केवळ कलेकरिताच आहे, असाही एक समज आहे. परंतु रवीन्द्रनाथ मात्र या मताचे विरुद्ध आहेत. त्यांचे म्हणणे असे की, ही कलेची भावना कलेला जीवनापासून अलग करते, मग मानव प्राणी व इतर प्राण्यांत फरक तो काय ? अर्थात फरक उरणार नाही. म्हणून केवळ आनंदाकरिता किंवा सुखसमाधानाकरिताच कला राबविली जात असेल तर इतर पशुपक्षांत व मानवात फारसा फरक उरणार नाही. समस्त प्राणीमात्र आनंदाच्या किंवा सुखाच्या मागे लागलेला असतो आणि आपली वासनापूर्ती करून समाधानाने जगतो. पण मानवाच्या वासना, भावना व त्याचा आनंद आणि त्यांची तृप्ती इतरांपेक्षा अधिक उच्च कोटीतून विचारवंत मनातून करून घेत असल्यामुळे अर्थातच वरील विधानाने समाधान होत नाही. पशू आपल्या भावना शारीरिक वासना तृप्त करण्याच्या मागे लागलेला असतो. आणि त्याचे ज्ञान त्याला तेवढया पुरतेच मर्यादित असते. परंतु मानव हा ज्ञानाचा सागर आहे, त्याच्या वासना, भावना वाढलेल्या, उंचावलेल्या आहेत, अर्थात आनंद लुटण्याच्या व कलेच्या

रसास्वादनाच्या क्षेत्रातही तो कमी राहू शकत नाही. कारण पदार्थविज्ञान आणि प्राणीशास्त्राचा तो अभ्यासक आहे. मानसशास्त्र व विज्ञानाचाच नव्हे तर आज समस्त शाखांचा तो विद्यार्थी आहे. यातूनच नैतिक व सामाजिक दृष्टिकोणातून पाहिल्यास मानव हा इतर प्राण्यांपेक्षा समोर आहे. प्रेम, वासना, भावना, इच्छा, तृप्ती ह्या सर्व गोष्टी नैतिक व सामाजिक बंधनाने बांधल्या गेल्या आहेत. त्याही बौद्धिक स्तरांतून व त्यातच त्यांच्या जीवनाचे सार दडले आहे, नव्हे यातच त्याची भलाई आहे. तसे पाहू जाता, इतर प्राणी व मानवप्राणी आपापल्या वासना सहज तृप्त करू शकतात पण दोहोंत हा जो मूलभूत फरक आढळून येतो हे विसरता येत नाही. त्याची गल्लत किंवा फारकत केल्यास ही पायमल्ली मानवी समाजाला रसातळाला नेईल. अनेक अनर्थ ओढवले जातील व मानवी संहार थोटे पडतील. म्हणूनच मानव या तत्त्वांना जीवनमूल्य समजून वागत असतो. मानवी प्रगतीच्या उंच शिखरावर मानव पोचत असला तरी या तत्त्वांना तो चिटकून आहे.

मानव हा भावनाप्रधान प्राणी असून भावनांना व्यक्त करण्याचा मूलमंत्र त्याला साध्य झाला आहे. तो स्वतः भावनेचा एक मोठा खजिना आहे आणि या भावनेच्या तंत्रातूनच कला ही जन्म पावली आहे. मानव हा एकचएक असा प्राणी आहे की त्याला आपल्या स्वतःचा बोध होतो. बुद्धी, वाचा, संयम आणि भाषा ह्यासारख्या अचाट वस्तूंची देणगी त्याला लाभली आहे. आपल्या व्यक्तित्वाचा ठसा तो उमटवीत असतो आणि हेही सत्य आहे की ज्यावेळी तो कलेची निर्मिती करतो त्यावेळी त्याच्या व्यक्तिमत्वाचा स्पष्ट ठसा कलाकृतीत दिसून येतो.

हे विश्व आणि यातील घडामोडी कोणत्या ना कोणत्या प्रकारे आमच्या व्यक्तित्वाचे अंग बनले असते. संसारात जेव्हा आपण जगतांतील वस्तूंना पसंत करतो, पाहतो, सांगतो, ऐकतो, चाखतो, पारखतो यांच्या व इतरांप्रति आपल्या मनात ईर्ष्या, इच्छा, प्रेम, मोह उत्पन्न करतात तेव्हा हे सर्व आपल्या जीवनात आपल्या शरीराचा एक अंग बनते. कला व विज्ञान यात फरक आहे. विज्ञान आम्हाला पदार्थ वस्तूंचे ज्ञान करून देते तर कला मानवाच्या व्यक्तित्वाचे ज्ञान करून देते आणि म्हणूनच कलाकृतींना नेहमी पाहूनही आपण पुन्हा पुन्हा पाहण्याचा प्रयत्न करतो तरी त्या कला वस्तूंचा वीट येत नाही किंवा त्या टाकाऊ ठरत नाहीत. याचे कारण असे की, कला ही जीवनाचे एक अंग आहे. कलाकृती व वैज्ञानिक साहित्य निर्माण करण्याची साधनेही वेगवेगळी आहेत. विज्ञानाची भाषा सरल आहे तर कलेची भाषा भावनोत्कट असते. ती सहज व्यक्त करता येत नाही. प्रयासानेच ती निर्माण होते. आपण जेव्हा एखादी वस्तू अर्थात सुंदर वस्तू पाहतो तेव्हा आपल्या हृदयात तल्लिनतेची भरती येते. तुफान आल्यासारखे

होते व त्यातूनच कलेची किंवा कलाकृतीची कलावंताच्या हस्ते निर्मिती यात कलावंताचे व्यक्तित्व स्वाभाविकच उत्पन्न होते व त्या कलावंताची त। कलाकृती ठरते.

पुढे जाऊन टागोर म्हणतात, पुरुष अलंकारांना महत्व देत नाही. परंतु स्त्रियांना अलंकारांची इच्छा अधिक प्रबल असते. त्या मोठ्या आवडीने अलंकार परिधान करतात अर्थात त्यांची उपयोगिता त्यात त्यांना असते असे नाही, तर सौंदर्यप्रसाधने म्हणून त्या वापरतात. यात आनंद आहे. उपयुक्तता जीवनाच्या दृष्टीने काहीच नाही. कलेचा उद्देश व्यक्तीच्या व्यक्तिकरणाकरिता आहे; सौंदर्याकरिता नाही.

कलाकृती सुंदर, सरळ व जीवनोपयोगी असावयास पाहिजे. शिवाय त्यात रसोत्पत्ती झाली पाहिजे. जेव्हा आपला संबंध कोणत्याही वस्तूशी अधिक येतो तेव्हा तिच्या आत्म्याशी आपण समरस होतो, नव्हे त्या वस्तूच्या आत्म्याला सहज समजून घेतो आणि तिच्या विशेषतेकडे किंवा उपयुक्ततेकडे अधिक लक्ष पुरविले जात नाही. उदा. जेव्हा आपण चित्रात एखाद्या झाडाचे चित्र रंगवितो तेव्हा त्या झाडाच्या डहाळ्या किंवा पाने मोजून बरोबर काढत नाही. वास्तविक पाहता कलेचे मुख्य वैशिष्टय हे की कलेत वस्तूच्या विशेषतेकडे लक्ष न पुरविता तिच्या अंतरंगात जाऊन तिच्या आत्म्याचे दर्शन घडविणे. म्हणजेच कला ही वस्तुनिष्ठ न रंगविता आत्मनिष्ठ रंगविली जाते. यात व्यक्ती बहिर्मुख होण्यापेक्षा अंतर्मुख होत असते व त्यातूनच आंतरमनाचे द्वंद्व चित्रित होते, हीच ती कलाकृती होय—ही व्यक्तिनिष्ठ असते.

—धनंजय नाकाडे

[संख्येने, तसेच गुणज्ञतेच्या निकषाने रसिकांपर्यंत पोचण्याचे ललितसाहित्याचे सामर्थ्य वादातीत आहे. रसज्ञाच्या मनाला नुसता तिर्यक् स्पर्श न करता, त्यांच्या मनोभूमीत रुजण्याचं, अंकुरित होण्याचं सामर्थ्य ज्या प्रमाणात ललित साहित्यात असेल, त्याप्रमाणात ते अक्षरवाङ्मयाच्या पंढरीच्या दिशेने वाट कापीत आहे असे समजणे उचित. ही एक दृष्टी मनात ठेवून निरनिराळया मासिकांतून दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या ललित साहित्याकडे अंगुलीनिर्देश करण्याचे योजिले आहे. कालमर्यादा म्हटली की वाचनमर्यादा आलीच. या मर्यादे-पलीकडेही चांगले साहित्य आहेच. वाचकांनी आणि लेखकांनी ही भूमिका लक्ष्यात ठेविल्यास गैरसमज होणार नाही ही आशा.]

सत्यकथेच्या जानेवारीच्या अंकात श्री. कृ. द. दीक्षित यांनी 'केवलं ज्ञानमूर्तिम्' या शीर्षकाखाली लिहिलेले, कै. प्रा. रा. कृ. लागू यांचे शब्दचित्र मनोज्ञ आहे. गेल्या पिढीतील या ज्ञानवंत, तपस्वी अध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली ज्यांनी ज्ञानसाधना केली असेल ते नशिबवान. प्रा. लागूंचा लोभ संपादन केलेल्या त्यांच्या शिष्याने, श्री. दीक्षितांनी मोठ्या सश्रद्ध मनाने भावपूर्ण शब्दात घडविलेला आपल्या गुरूंचा परिचय खास आवडावा असाच उतरला आहे. याच अंकातील असाच मनाला रिझविणारा दुसरा लेख श्री. केशवराव भोळे यांचा 'माझा आवडता राग यमन.' विशेषतः मराठीतील नाट्यसंगीताने ज्यांच्यावर मोहिनी घातली असे रसिक, या लेखात श्री. भोळे यांनी उद्धृत केलेल्या नाट्य गीतातील आवडत्या 'जागा' वाचून त्या 'जागा' क्षणभर मनातल्या मनात निश्चित घोळतील इतक्या त्या अचूक आहेत. आपल्या आवडत्या रागाविषयी उत्कटतेने रसपूर्ण शैलीत केलेले श्री. भोळे यांचे हे वर्णन वाचून कै. गोविंदराव टेंबे यांच्या लेखनाचे सहज स्मरण होते. श्री. कांत यांची 'काटे पिकू देऊ नकोस' श्री. तुळशीराम काजे यांची 'उन्चार' या कविता, आणि श्री. वसंत फेणे यांची 'मर्चंटचा बाप' ही कथा उल्लेखनीय.

सत्यकथेच्या फेब्रुवारीचा अंक उघडताना दिवंगत पंतप्रधान लालबहादुर शास्त्रीजींना वाहिलेली श्रद्धांजली वाचावयास मिळेल ही अपेक्षा होती. पण ती विफल ठरली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याविषयी अगदी एकाच पानात सामावलेला परंतु अत्यंत नेटका आणि समर्पक मूल्यमापनात्मक सत्यकथेतील एक लेख सहज आठवला आणि मग ही उणीव अधिकच खटकली.

श्री. संभाजी कदम यांचा 'मुंबईच्या चित्रकलेची पंचाहत्तर वर्षे' हा लेख विषयभूत प्रदर्शनाच्या अंतरंगातील गुणावगुणांची चांगलीच चिकित्सा करणारा आहे. प्रदर्शनामागील हेतूच्या यशापयशाची चिकित्सा करतानाच चित्रकारांचे स्वतःचे भिन्न कालखंडातील तसेच परस्परांतील तुलनात्मक मूल्यमापन महत्वाचे आहे. गेल्या दोन पिढींतील प्रसिद्ध चित्रकारांच्या गुणदोषांची मनमोकळी चर्चा या लेखात वाचावयास मिळते. श्री. चुडेकर यांच्या 'आफ्टर फिशिंग' या चित्रावरो-वर श्री. भोसल्यांप्रमाणे श्री. आगरकरांच्या चित्रकलेचा एकादा नमुना समाविष्ट केला असता, तर वरे झाले असते. श्री. आनंद यादव यांच्या कथेतील दोन जीव 'वाळा पाडा' आणि 'बापू' अखेर स्पष्टतेने जवळजवळ उभे करून श्री. यादवांनी आपल्या कथेची 'अखेरपु' जिंकली.

श्री. कांतांची 'हे गीत नव्हे', श्री. ग्रेस यांची 'दुपार', श्री. संजीवनी यांची 'शिणले असते रे' आणि श्री. म. म. देशपांडे यांची 'नसो लीनता' या कविता रसिकांना आवडाव्यात अशी अपेक्षा आहे.

सत्यकथेच्या मार्चच्या अंकात श्री. श्री. ज. जोशी यांनी कै. काकासाहेब गाडगीळ यांचे रेखाटलेले व्यक्तिचित्र ('ललित'च्या फेब्रुवारी अंकातील अशाच एका व्यक्तिचित्राप्रमाणे), श्री. य. दि. फडके यांनी केलेले 'पथिक'चे परीक्षण, श्री. घोंड यांनी घडविलेले ग्लॅडस्टन सालोमन यांचे दर्शन, श्री. बाबुराव बागुल यांची 'आई' ही कथा. आणि श्री. शंकर रामाणी यांची 'माझे उडाले घरटे' ही कविता वाचनीय वाटली.

काकासाहेबांच्या राजकीय जीवनाचा आढावा, त्यांच्या राजकारणाचे स्फूर्तिस्थान, राजकीय संसारातील समरक्षण आणि विशेषतः लोकमान्यांच्या निधनामुळे राजकीय दृष्ट्या पोरक्या झालेल्या महाराष्ट्रावर गांधीवादाची छाप पडण्याच्या संधिकालातील घटनांचा आटोपशीर उल्लेख हरखून केले आहेत. त्यांच्या साहित्य संसाराचे वर्णन लेखविस्ताराला शक्य तेवढे आहे हेही योग्य. श्री. य. दि. फडके यांनी काकासाहेबांच्या 'पथिक'चे परीक्षण पुरेशा निर्भीडपणे केले आहे. काकासाहेबांच्या राजकारणाकडे बघण्याचा दृष्टीकोन मूलतः 'रोमँटिक' की काय हा उत्तरसूचक प्रश्न त्यांनी उघडपणे टाकला आहे. या लेखातील 'पथिक'मधील निवडक उतारे वाचकवर्गाला 'पथिक' वाचावयास लावतील असे आहेत.

ग्लॅडस्टन सालोमन यांच्या कर्तृत्वाचा शब्दपट श्री. घोंड यांनी प्रमाणशीर आखला आहे. जे जे स्कूल ऑफ आर्ट या नामवंत कलाविद्यालयाची घडण कशी घडून आली याचा मनोरंजक इतिहास सर्वसाधारण वाचकालाही 'रस' घेण्या-इतपत रुचकर आहे, मग त्या कलेतील 'जाणकारांची' गोष्ट नकोच.

श्री. बाबूराव बागूल यांनी 'आई' साफ साफ भाषेत, परंतु चांगल्या प्रभावीपणाने उभी केली आहे. या कथेचा शेवट तर मोठा बहारदार--घटनेच्या दृष्टीने आणि ती व्यक्त करण्याच्या शब्दयोजनेनेही. या कथेतील श्री. बागूल यांचे 'गेली आठ दहा वर्षे अतृप्त असलेल्या तिच्या व्याकुळ शरीरात वासनेची वीणा हळूहळू बोलू लागली.' हे एक अर्थगर्भ आणि सहजसुंदर वाक्य, नमुना म्हणून वाचकांनी न्याहाळावे.

'ललित'चा जानेवारीचा अंक हैदराबाद येथील मराठी साहित्य संमेलनाने अपरिहार्यपणे व्यापला आहे. ठणठणपाल आणि वारकरी या उभयतांचे संमेलन-विषयक लेख खोचक तरीही रोचक वाटतात.. 'कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही' हा श्री. माधव गडकऱ्यांचा छोटेखानी चटकदार लेख उद्धृत करण्यात संपादकांनी मराठीतील सर्वश्रेष्ठ नाटककार राम गणेशांचे पुण्यस्मरण केले हे योग्य झाले. श्री. शंकर सारडा यांचा मॉम वरील त्रुटित लेख वाचकाला आवडेल.

'ललित'ने फेब्रुवारीच्या अंकात दोन चांगले उपक्रम आखले. ते आवडले. १९६५ सालातील पुस्तके हा एक व दुसरा (संकल्पित) मराठी लेखकाला नोबेल पारितोषिक द्यावयाचे झाले तर तुमची शिफारस हे वाचकवर्गाला केलेले आवाहन. (तेही 'संपारितोषिक') श्री. जोशी (श्री. ज.) यांनी रेखाटलेले काकासाहेब गाडगीळांचे) व श्री. जोशी (महादेव शास्त्री) यांचे श्री. बेहेरे यांनी काढलेले ही दोन्ही शब्दचित्रे चांगली आहेत.

मराठवाड्यातून प्रसिद्ध होणाऱ्या 'प्रतिष्ठा'च्या फेब्रुवारी अंकात श्री. चंद्रकांत पाटील यांच्या दोन कविता आणि श्री. नरेश परळीकर यांची 'चिंतामणी आणि एकरात्र' ही कथा, नजरेत भरतात.

'साहित्य सहकार'च्या ताज्या अंकात श्री. शं. ना. वर्वे यांनीही काकासाहेब गाडगीळांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

ए. सा. वा.

अनुक्रमणिका

पत्रव्यवहार

संपादक, युगवाणी नागपूर यांस—

स. न. वि. वि.

मार्च १९६६चा 'युगवाणी'चा अंक मी वाचला. त्यातील डॉ. कानडे व श्री. कुळकर्णी यांचा लिखित "बायको : मराठी भाषेतील एक आप्तसंबंध" हा लेख वाचला. तो मला आवडलाही फार. परंतु त्यातील मला एक चूक सांगायची आहे. ती चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न झाला तर बरेच होईल. पान नं. ५१२ वर अकराव्या ओळीत "गोंड" या जमातीतील पत्नीवाचक शब्द "मायजु" असा लिहिला गेला आहे. पण तो चुकीचा आहे.

"माय्जु" किंवा "मायज्यो" हे शब्द मराठीतील "माऊली" किंवा 'मायमाजी" या अर्थाने वापरतात. सामान्यतः सर्वच गोंड लोक सर्वसाधारण स्त्रीला "माय्ज्यो, माय्जु" असे संबोधितात.

गोंड लोक आपल्या पत्नीस इतरांशी बोलताना 'नारोता' (माझ्या घरची); 'रोनवाले' (घरवाली); असे व पत्नीला हाक मारताना 'रनिया' (राणी); 'पटले' (पाटलीण); 'सुरवा'; 'रँगला'; 'बाकाई' अशा शब्दांनी सुरवात करतात. याशिवाय—'संगो'; 'मोहना'; 'बिंदला'; 'कुँवरीपड्डा'; 'वटुवा 'लाळी'; 'छल्लो'; 'येने' इत्यादि शब्दही पत्नीवाचक म्हणून उपयोगात आणतात.

'येने' या शब्दाचा अर्थ 'मामाची मुलगी' असा आहे. अर्थात यट्टयाची होत असल्याकारणाने पत्निवाचक उपयोग करीत असतात. पण तो तेवढा ग्राह्य नाही.

अशा प्रकारची दुरुस्ती मी सुचविलेली आहे. आपणास जर ग्राह्य असेल तर उपयोग करावा ही विनंती.

आपला

व्यंकटराव बिसनसिंह आचाम, गुरुजी
आदिवासीनगर कॅंप, अमरावती.

साभारपोच

फेब्रुवारी–मार्च ६६

१ भारतीय सैन्याच्या परंपरा	जन. करिअप्पा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ ५–००
२ काही पुस्तके : काही लेखक	श्री. शंकर सारडा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ १२–५०
३ सह्याद्रीचे सोने	श्री. दत्ता कदम, पॉप्युलर प्रकाशन, ४–००
४ धन्य मी कृतार्थ मी !	श्री. शं. गो. साठे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ ४–००
५ माझे काही वृत्तपत्रीय लेखन	श्री. पां. वा. गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ १२–५०
६ वालचंद हिराचंद	श्री. गं. दे. खानोलकर, शठ वालचंद हिराचंद मेमोरियल ट्रस्ट, मुंबई ३०–००
७ पुन्हा कविता	संपा–श्री. चंद्रकांत पाटील व श्री. ना. घों. महानेर, श्री. रायभान जाधव, मॅकिकन हॉल, रमाबाई रोड, मुंबई ७ २–५०
८ जीवी	अनु : आनंदीबाई शिर्के, भारतीय ग्रंथ-भवन, दादर, मुंबई १४ २–५०
९ प्राचीन इतिहास (इतिहास आणि संस्कृती)	श्री. व. दि. राव, भारतीय ग्रंथभवन, दादर, मुंबई १४ ८–००
१० हितगुज	श्री. वाळ सामंत, भारतीय ग्रंथभवन, दादर, मुंबई १४ १५–००
११ स्वामी रामतीर्थ	श्री. रा. शर्मा, अनु : श्री. वा. शि. आपटे, भारतीय ग्रंथभवन, मुंबई १४ ५–००
१२ साम्ययोगी विनोबा	श्री. वसंत नारगोळकर, भारतीय ग्रंथ-भवन, दादर, मुंबई १४ ८–००
१३ श्रीरमण महर्षी	ले. आर्थर ऑसबोर्न, अनु–डॉ. ह. गं. मोघे, भारतीय ग्रंथभवन, दादर, मुंबई १४ ५-०
१४ नाटक झाले जन्माचे	श्री. ल. ना. भावे, भारतीय ग्रंथभवन, दादर, मुंबई १४ ८–००
१५ माणिक-मोती	(महाराष्ट्र टाईम्समधील गोष्टी) जगताप –कारले प्रकाशन, शुक्रवार पुणे, ८–००

१६ प्रीतीचा पालव	श्री. म. ना. देशपांडे, भारतीय ग्रंथमवन, मुंबई, ६–००
१७ चीनमधील कामगार	ले. ई. प्रीस्टले, अनु–श्री. अ. स. मराठे, वोरा आणि कं. प्रा. लि. ३, राऊंड बिल्डिग मुंबई १–५०
१८ चीनमधील शिक्षण	अनु–श्री. स. गं. मालशे, वोरा आणि कं. फडके प्रा. लि., मुंबई १–००
१९ चीनची नागरी कम्यून्स	अनु–श्री. चं. वि. बावडेकर, वोरा आणि कं. फडके प्रा. लि., मुंबई १–००
२० लाखाची करामत	श्री. मा. ना. कानिटकर, जगताप–कारले प्रकाशन, १९२, शुक्रवार, पुणे २, ०–७५
२१ सोन्याची माळ	श्री. मा. ना. कानिटकर, जगताप–कारले प्रकाशन, १०२, शुक्रवार, पुणे २, ०–७५
२२ रामुअण्णा किर्लोस्कर	संपा० जीवन किर्लोस्कर, जीवन किर्लो-स्कर, डॉ. भडकमकर बंगला, ३९/४९, एरंडवणा, पुणे १४ १२–००
२३ आहार	श्री. रामुअण्णा किर्लोस्कर, जीवन किर्लो स्कर, डॉ. भडकमळर बंगला, ३९/४९, एरंडवणा, पुणे १४ ३–००
२४ Notes On Vedant	श्री. रामुअण्णा किर्लोस्कर, जीवन किर्लो-स्कर, डॉ. भडकमकर बंगला, ३९/४९, एरंडवणा, पुणे १४ २–००
२५ रूपरेखा (कविता)	श्री. गोविंद जोशी, व्हीनस, पुणे, ३–००
२६ धर्मरहस्य	डॉ. के. ल. दप्तरी महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ३–००
२७ माणसाचा मेंदू आणि त्याचे कार्य	डॉ. म. ग. गोगटे, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. १–५०
२७ Kudali	ए. एम्. घाटगे, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई ५–००
२९ मनोहर गीत (कविता)	म. दि. टेकाडे, पूजा प्रकाशन, नागपूर, २–००
